शुध्द आरोग्यदायी चटकदार खडे मसाले

लवंग	काळीमिरी	हिरवी वेलापत्री	मसाला वेलापत्री	जावित्री
रामपत्री	जायफळ	खसखस	नाकेश्वर	त्रिफळा
सुंठ	जिरा	ओवा	बडीशोप	शहाजीरा
तमालपत्र	दगडफुल	कर्णफुल	हळकुंड	खोबरं
मिरवी	तिळ	धने	दालचिनी	खडा हिंग/पावडर

उत्कृष्ट दर्जा मासक दर..
मिक्स खडा मसाला उपलब्ध
भूमी एजन्सीज
सुगमेवा आणि मसाल्याचे ठोक व किरकोळ विक्रेते
Follow us @bhoomiagencies
आनंद कॉम्प्लेक्स, दाळ मंडई, अ.नगर. M. 9011163452

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

स्नेह भोज
स्नाह मिल से मिल तक !
बारसे, डोहाळे जेवण, साखरपुडा, रोट टू गेदर अश्या छोटेखानी समारंभांसाठी परफेक्ट हॉल आणि सोबत स्नेहभोजची रुचकर थाळी सुद्धा...
बजेटमध्ये सुटसुटीत कार्यक्रम
रुचिरा टॉवर्स, झोपडी कॅन्टीन, सावेडी, अहमदनगर
86 98 8080 88

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, मंगळवार दि. ०९.०७.२०२४ | अंक नं. ११० | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

स्वरोटीवर आकर्षक गिफ्ट
आला रे आला राजपाल सेल आला..!
30% 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर (0241) 2999299
संगमनेर (02425) 222226
नारायणगाव (02132) 242132

वर्षानुवर्षे राहत असलेली घरे खाली करण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या मालमत्ताधारकांना 'नोटिसा'

'बेघर' करण्याचा प्रयत्न केल्यास 'देहत्याग' हाच पर्याय: सारसनगरमधील शासकिय जमिनीचे प्रकरण

नगर – आयुष्यभराची कमाई खर्च करून आपले हक्काचे उभे करणाऱ्या सामान्य नागरिकांना बेघर करण्याचा घाट जिल्हा प्रशासनाने घातला आहे. जागा सरकारजमा करण्यासंदर्भात मालमत्ताधारकांना नोटीसा काढण्यात येत आहेत. प्रशासनातील तत्कालिन अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या कामाचा फटका सामान्य नागरिकांना सहन करण्याची वेळ आली असल्याने तात्पतणाचे आतापर्यंत दोघाजणांचा मृत्यू झाला आहे. चोर सोडून संन्याशाला फाशी देण्याच्या प्रशासनाच्या अजब कारभारामुळे सामान्य कुटुंब धास्तावले आहेत. सदर प्रकरणात न्याय न मिळाल्यास नागरिकांना 'देहत्याग' करण्याशिवाय पर्याय राहणार नसल्याचे या मालमत्ताधारकांनी स्पष्ट केले आहे.

सारसनगर येथील नवीन सर्व्हे नंबर १४९ मध्ये १९६६ मध्ये तत्तालिन जिल्हाधिकारी यांनी शासकीय जमीनीची जाहीर लिलावाद्वारे विक्री केली होती. त्यात काही अनियमितता तसेच १९८२ ते १९९५ दरम्यान काही शासकीय कर्मचाऱ्यांनी काही गैरप्रकार केल्याचे निदर्शनास येत असल्याने तक्रारदार यांनी लोकायुक्तांकडे तक्रार केली होती. त्यानुसार ५८ शासकीय कर्मचारी त्यात तत्तालिन जिल्हाधिकारी, सहाय्यक संचालक नगररचनाकार, उप विभागीय अधिकारी, तहसीलदार, सर्कल आणि तलाठी यांच्यावर एफआयआर दाखल करण्यात आले होते. परंतु सदर रेखांकन मंजुर असल्याने व सर्व सरकार दफ्तरी कागदपत्रे कायदेशीर असल्याने, ३० वर्षाचे सर्व रिपोर्ट्स व्यवस्थित आसल्याने व जाहीर प्रक्रटीकरण देऊन सामान्य निष्पाप नागरिकांनी या रेखांकन मधील मुखंड खरेदी करून रितसर बांधकाम परवानगी घेऊनच अपार्टमेन्ट फ्लेट, रो हौसेस आणि वैयक्तिक बंगले खरेदी केले अथवा बांधुन गेली ३०-३५ वर्ष राहात आहे. यात कही जणांनी बँक प्रकरणे करून घरे खरेदी केली. असे असताना जिल्हाधिकारी कार्यालयातून सामान्य नागरिकांना नाहक नोटिसा दिल्या जात आहेत. साधारण ८९ मालमत्ता धारकांना ८ जुलैला उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयातील सुनावणीसाठी ६ जुलैला म्हणजे फक्त एक दोन दिवस आधी नोटीसा देऊन म्हणणे आणि पुरावे देण्यास सांगितले नाहीतर संपुर्ण रेखांकन रिव्हीजनमध्ये घेऊन सर्वसामान्य नागरिकांना बेघर करुन सदर जमीन शासन दरबारी जमा करण्याच्या नोटीसा दिल्या जात आहेत. वास्तविक काही दिवसांपुर्वी तत्तालिन खासदार सुजय विखे, जिल्हाधिकारी, सहाय्यक संचालक नगररचनाकार, उपविभागीय अधिकारी, टाऊन प्लॅनिंग अधिकारी, तहसीलदार आणि सर्व संबंधित सरकारी अधिकारी यांच्या उपस्थितीत सदर विषयासंदर्भात एक बैठक आयोजित केली होती. त्यात सर्वांनी हे मान्य केले होते की सदर प्रकारणात मालमत्ता धारकांचा कुठलाही दोष नाही. जी काही अनियमितता झाल्या असतील त्या सर्व शासकीय अधिकारी यांचा गैरप्रकार आहे. त्यामुळे सामान्य नागरिक यांना दिलासा द्यावा लागेल व त्यासाठी ज्या काही अनियमितता असेल त्या नियमित करण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न केला जाईल. परंतु सामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागणार नाही. परंतु निवडणूक झाली आणि परत सामान्य निष्पाप नागरिकांच्या मालमत्ता बेकायदेशीर ठरवण्याचा घाट घातला जात आहे. वास्तविक सरकारी कागदपत्रे, सातबारा, फेरफार नोंदी, जिल्हाधिकारी मंजुर बिनशेती रेखांकन आदेश यावर विश्वास ठेवणे हे कायद्याने अभिप्रेत आहे. यात कुठलाही दोष नाही असे असताना सामान्य नागरिकांना वेठीस धरून बेघर का केले जात आहे तेही ३०-३५ वर्षानंतर, मुळतः कायद्याने कुठल्याही तक्रारीसाठी १२ वर्ष ही कालमर्यादा आहे तेही सामान्य नागरिकांसाठी कारण त्यांना सर्व बाबींवर व्यवस्थित माहिती मिळत नसते. परंतु जिल्हाधिकारी कार्यालय आणि महसुल विभाग यांना सर्व बाबी माहीत नव्हत्या का आणि रेखांकन मंजुर करताना सर्व बाबींवर विचार का करण्यात आला नाही हा दोष कोणाचा आहे आणि जर काही गैरप्रकार असेल तर त्याची जबाबदारी त्या शासकीय कर्मचाऱ्यांवर निश्चित करून सर्व नुकसान भरपाई त्यांच्या शिरावरच असावी त्यामुळे या नोटीसांमुळे सामान्य मालमत्ता धारकांना प्रचंड मानसिक ताणतणाव होत आहे.

आतापर्यंत या कारणाने दोन जणांचा मृत्यू झाला आहे त्यामुळे सर्व मालमत्ता धारकांकडुन लोकप्रतिनिधी, खासदार, महसुल मंत्री, मुख्यमंत्री, सामाजिक कार्यकर्ते यांनी जातीने लक्ष घालून सर्व सामान्य नागरिकांना न्याय मिळवुन द्यावा. भारत सरकारकडुन बेघरांना हक्काची घरे देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. मुख्यमंत्री यांच्याकडुन झोपडपट्टी पुनर्वसन करून त्यांना हक्काचे घरे देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. असे असताना ज्यांनी आपल्या आयुष्यभराची कमाई खर्च करून आपले हक्काचे घर केले त्यांना बेघर करणे नक्कीच योग्य नाही. जर न्याय मिळाला नाही तर नागरिकांना आपला देहत्याग करण्याशिवाय पर्याय उरणार नाही. सामान्य नागरिकांनी साधारण २५-३० वर्ष पुर्व खरेदी केली असताना ३५-६० वर्षापुर्वीचे पुरावे कसे देणार आणि गैरप्रकार करणारे शासकीय कर्मचारी मग त्यांनी गैरप्रकार केला का नाही हे सामान्य निष्पाप नागरिक कसे सिध्द करणार, असा सवाल या मालमत्ताधारकांनी केला आहे.

महापालिका आयुक्तपदी देविदास पवार यांची नियुक्ती

नगर – लाचखोरीचा गुन्हा दाखल झालेल्या नगर महापालिका आयुक्त डॉ. पंकज जावळे यांच्या जागी शासनाने अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयातील सह आयुक्त देविदास पवार यांची आयुक्त पदी नियुक्ती केली आहे. नगर विकास विभागाचे अवर सचिव अ.का.लक्कस यांनी याबाबतचे आदेश सोमवारी (दि.८) सायंकाळी काढले आहेत.

नवनियुक्त आयुक्त देवीदास पवार यांची परळी, लातूर, विरार, यवतमाळ, उल्हासनगर, बदलापूर, अंबरनाथ येथे मुख्यमाधिकारी तसेच परभणी, जळगाव येथे आयुक्तच या पदावर काम केले आहे. त्यांची तब्बल २२ वर्ष प्रशासकीय सेवा झाली आहे. अमरावती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त म्हणून ते कार्यरत होते. डॉ.प्रदीप अहीकर हे सेवानिवृत्त झाल्यानंतर पवार यांच्याकडे आयुक्त पदाचा पदभार देण्यात आला होता.

सध्या त्यांची अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयात येथे सह आयुक्त म्हणून बदली करण्यात आली होती. मूळ नांदेड जिल्हातील रहिवासी असलेले पवार यांचे शिक्षण परभणी येथे झाले. १९९६ मध्ये त्यांची परभणी जिल्हाधिकारी कार्यालयात पहिली नियुक्ती झाली. त्यानंतर त्यांनी यवतमाळ, उल्हासनगर, बदलापूर, अंबरनाथ येथील पालिकांमध्ये मुख्याधिकारी (सीओ) म्हणून कार्य केले.

नव्याने बदलून आलेले आयुक्त शहरासाठी ठरतील का उपयुक्त?

नगरवासीयांतर्फे जागरुक नागरिक मंचाचे अनावृत्त पत्र

शहरातील विविध समस्यांसंदर्भात मुख्यमंत्र्यांकडे केलेला पत्रव्यवहार तसेच याबाबतचे वृत्त प्रकाशित झालेले दैनिक नवा मराठातील वृत्त दाखवितना जागरुक नागरिक मंचचे पदाधिकारी.

नगर – सालाबादप्रमाणे अवघ्या दीड दोन वर्षात मनपाचे आयुक्त हे अणीभ झाल्यामुळे अचानक नगरी पंगत सोडून हात धुवून उठून गेले. त्यांचा विरह अनेक संबंधित समाजसेवकांना आणि ठेकेदारांना जाणवत राहील. नगर शहर संभ्रमण अवस्थेमधून जात असताना, जागरुक नागरिक मंचतर्फे मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्राची गंभीर दखल घेऊन ताडडीने नवीन आयुक्ताची नियुक्ती करण्यात आली आहे. या नवनियुक्त आयुक्तांना जागरुक नागरिक मंचाचे अध्यक्ष सुहास मुळे यांनी अनावृत्त पत्र दिले आहे.

या पत्रात म्हटले आहे की, असं म्हणतात की काही ठिकाणच्या मातीलच गडबड असते, तसेच आमच्या अहमदनगर शहराचे आहे. या शहराला शासनाकडून सतत सावत्र वागणूकच मिळते. मग ते जिल्हा पोलीस अधीक्षक असो जिल्हाधिकारी असो किंवा मनपा आयुक्त असो. फार पूर्वीचे एक दोन अपवाद वगळले तर या शहरातून बरेच खतपाणी मिळत असलेतरी यापैकी एकही अधिकारी दोन वर्षापेक्षा जास्त या मातीत रुजतच नाही. हे सर्व अधिकारी आल्या आल्या महिना दोन महिने फुल रिचार्ज असल्यासारखे दाखवतात आणि नंतर व्हॅटिलेटरवर जातात. या अधिकाऱ्यांची दिड दोन वर्षाची तुटपुंजी कारकीर्द देखील कुचकामी ठरते.

आजपर्यंत साक्षात ब्रह्मदेवालाही न समजलेलं या शहरातलं गटातटाचं राजकारण.. अति विद्वान लोकप्रतिनिधींचा गटारीपासून कचऱ्याच्या मोटारीपर्यंतचा हस्तक्षेप, कार्यकर्त्यांच्या संध्याकाळी सहानंतर मनपामध्ये गळाभेटी, व आलेल्या निधीबाबत प्रचंड पळवापळवी, अनामींदी, गोठ्यात बांधलेल्या कार्यकर्ते नावाच्या कळपाला काहीही समजत नसताना दिले गेलेले खरे खोटे टेंडर व त्याच्याविरुद्ध बनावट आंदोलन करणारे बनावट कार्यकर्ते नेमके कोण आहेत हे समजण्यामध्येच त्या अधिकाऱ्यांचे हे एक दोन वर्षे निघून जातात. अहमदनगर शहराच्या गल्ही बोळा, रस्ते, चौक याची साधी तोंड ओळख देखील संपूर्णतः या अधिकाऱ्यांना होत नाही, समस्या तर बाजूलाच राहिल्या, तो या शहराच्या प्रेमात पडत नाही, तोच बदलीच्या ठिकाणी त्यांचे सामान भरायला सुरुवात होते. असे तुमचे देखील होऊ नये अशी शासन चरणी प्रार्थना आहे.

आयुक्त, उपायुक्त ही पदे जनतेच्या खऱ्या अर्थाने उपयुक्त असावीत म्हणूनच कदाचित त्या पदांना संविधानाच्या व्याकरणांमध्ये तशी नावे दिली असतील, परंतु दुर्दैवाने आयुक्त आणि उपायुक्त यांचा ९०% प्रशासकीय वेळ हा कुठलाही निष्कर्ष न निघणाऱ्या मिटिंगांमध्ये आणि अडलेल्या नडलेल्या वजनदार फाईलींवर सह्या करण्यामध्ये जातो. उरलेला दहा टक्के वेळ ते मोबाईलवर बोलत असतात. त्यांना शहरात प्रत्यक्ष हिंडायला वेळच मिळत नाही. तेव्हा तुम्ही आल्या आल्या जरा नगर शहरातून एक आठवडाभर प्रमाणुनसार दुचाकीवर का होईना जर प्रमातफेरी मारली तर नगरवासीयांच्या दृष्टीने फार आनंदाची गोष्ट ठरेल. कारण हा कर नावाची आगाऊ खंडणी भरणारी, ही निवडक प्रामाणिक दिनदुबळी जनता तुमच्या समोर प्रत्यक्ष गाऱ्हाणे मांडूच शकत नाही, त्यामुळे नगरवासीयांकडून आपण आल्या आल्या आपणासमोर समस्यांचा पाढा वाचून टाकतो आहोत. बघा तुम्हाला यातून कशाला प्राधान्य द्यावंसं वाटतं ते...

शहराचे गावठाण चक्क नांगरलेल्या शेतासारखे झालेले असून, भुयारी गटार योजना, (पुढील मजकूर पान २ वर)

HOLY CROSS HOSPITAL HEALTH FOR ALL
अंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्यावत सुविधायुक्त
इंडो आयरिश हॉस्पिटल
हृदयरोग, मधुमेह, उच्चरक्तदाब, पाठदुखी, गुडघेदुखी, स्त्रीरोग, बालरोग, किडनी विकार, डायलेसीस, जनरल सर्जरी
तज्ञ डॉक्टर
डॉ. दिलीप जोंधळे MBBS, MD, M.R.C.P.I, F.R.C.P.I (Ireland) जन. मेडिसीन
डॉ. अनिल जाधव MBBS, MD जन. मेडिसीन
डॉ. मिलिंद कोरडे MD (MED), DNB (MED), DM(Cardiology), MRCP(UK), FSCAI, FRCP(Edin) कार्डिओलॉजिस्ट
डॉ. प्रदीप कंठाळी MBBS DNB (Gen. Medicine), DM(Cardiology) कार्डिओलॉजिस्ट
डॉ. धैर्यशील गायकवाड MBBS, Dip. Ortho. अस्थिरोग तज्ञ
डॉ. संदिप सुरवसे MBBS, MS (General Surgery) जनरल सर्जरी
डॉ. प्रतीक्षा पवार-परहर MBBS, MS (Ob & Gyn) स्त्रीरोग व प्रसूती रोग तज्ञ
डॉ. योगिता शेरकर MBBS, MS (Ob & Gyn) स्त्रीरोग व प्रसूती रोग तज्ञ
डॉ. सागर शिरसाठ पाटील MBBS, DGO, DNB, FMAS, DRM, NNMMB स्त्रीरोग, प्रसूती रोग व वंध्यत्व निवारण तज्ञ
डॉ. गणेश मिसाळ MBBS DCH, IPPC, PGPN Paediatrician & Neonatologist बालरोग तज्ञ
डॉ. मिनल काळे (कोरडे) MBBS, DCH बालरोग तज्ञ व नवजात शिशु तज्ञ
डॉ. जयश्री गायकवाड MBBS, DCRS रेडीयोलॉजी रोग तज्ञ
डॉ. शरद माळऊकर MBBS, MD (Medicine) DM Nephro. किडनी विकार तज्ञ
डॉ. आकाश बेरड MBBS, MD (Medicine) Fellowship in Nephro. किडनी विकार तज्ञ
सर्व कॅशलेस सुविधा उपलब्ध
मोफत साखर तपासणी
२४ तास अत्यावश्यक व ॲम्बुलन्स सुविधा उपलब्ध
ॲडमिशनची गरज भासल्यास ५०% पर्यंत सवलत
सोनोग्राफी, एक्स-रे, पॅथालॉजी, सीटी स्कॅन, ३डी इको, ईसीजी, एन्जीओग्राफी, संभव निदान व इतर सर्व तपासणीवर ५०% पर्यंत सवलत
इंडो आयरिश हॉस्पिटल
पत्ता : तपोवन रोड, सावेडी, अहमदनगर.
फोन : 0241-2423336, मो. 9130423336.
मोफत तपासणी
दिनांक: नांव
नोंदणी आवश्यक
Scan for Direction

॥ कुलस्वामिनी प्रसन्न ॥
शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
नगर-पुणे-नगर
आता आपल्या शहरातून
दरपत्रक
■ नगर वेळून स. ७,८,१ व दुपारी २.००
■ पुणे वेळून स.११,१२,२ व सायं.५ वा
Ac Xcent / WagonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
पिकअप पॉईंट -सिस्तला चौक, झोपडी कॅन्टीन, तारकपूर,रिक्षिंग, हाय पॅलेस चौक,कायनेटीक चौक,केडगाव
पुणे ड्रॉप- वाघोली, खराडी हायवाल,रेसव्हा, नवीन विश्वजीनगर बसस्टॉप, कुर्किन आवश्यक
अमर-प्रेम हॉलिडेज्
ऑफिस- चितळेरोड,अ.नगर 9657746555/ 9226399555

अप्रतिम सुगंध पुजेत आणील मनप्रसन्नता, एकाग्रता व शांती
निळकंठ प्रिमीयम प्रोडक्ट अगरबत्ती
केवल अगरबत्ती
आजच सर्व दुकानात मागणी करा
आडळे बाजार, सरसा मिसळ समोर, अ.नगर. तालुकावार वितरक नेमणे आहे

महाराष्ट्रातील सर्वात स्वस्त कापड मॉल महावीर मॉल
स्वस्त म्हणजे नक्की काय असते..?
रेनकोट आणि छत्री महोत्सव
सर्व शालेय विद्यार्थ्यांचे आणि लेडीजचे रेनकोट मिळतील.
झील आणि वर्षा रेनकोट वर 20% डिस्काउंट
लेडीज कुर्ती पॅंट सेट ससकट 20% डिस्काउंट
फॅन्सी क्रेप साडी 999/- रु. मधे 5 साड्या
भारी किंग साईझ बेडशीट वर 15% डिस्काउंट.*
वेगळ्या ठिकाणी आले तरच वेगळेपण पाहायला मिळेल..
अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

संपूर्ण स्टेशनरी वस्तूंमध्ये १०% सूट
गिफ्ट ॲण्ड स्कूल स्टेशनरी । होलसेल ॲण्ड रिटेलर
एक्सक्लुझिव्ह गिफ्ट, पर्सनालाईझ्ड गिफ्ट ॲण्ड टॉईज
आर.एन.आर्ट ॲण्ड क्राफ्ट
काका खवावालासमोर, नेता सुभाष चौक, चितळेरोड, अ.नगर
मो : 9325329061/ 9373417113

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य मुंढेचा

email - navamaratha@gmail.com

आली कुठुनशी कानी... टाळ मृदुंगाची धुन...

आषाढी एकादशी जवळ आलीय. अवघा महाराष्ट्र विठ्ठलमय झालाय. टाळ, मृदुंगाच्या धुनाने तन, मन भक्तिमय बनलेत. आपण नगरकर अधिक भाग्यवंत कारण या पुण्यभूमीतूनच नेवासा, देवगड, शेवगाच्या निवृत्तीनाथ, मुक्ताबाई यांसारख्या संतश्रेष्ठांच्या शिस्तप्रिय व अनोख्या दिंड्या आपल्याला अधिक पुण्यश्रीमंत करीत पंढरी तीर्थक्षेत्री जातात. भाविक नगरकर त्यांचे यथायोग्य पाहुणचार-सेवासुश्रुषा करतात.

याच वातावरणाने आपल्या वाचकांना संतमंडळी, वारी आणि एकूणच पंढरीसंबंधी अधिक माहिती द्यावी या प्रामाणिक उद्देशाने साप्ताहमर आषाढीवारी, संतमंडळीबाबत वैशिष्ट्यपूर्ण माहिती देण्याचा प्रयत्न करतोय.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

"मुसाफिर"-९८२२०२०६९१

जुन्या वारकऱ्यांसह, नव्या पिढीला ह्याचा फायदा होऊन आत्मिक वारी करून चिंतन, मनन वाढावे असाही हा छोटा प्रयत्न. संतपंरपरा व पुरोगामित्व लाभलेला महाराष्ट्र सध्या कशीशा चिंताजनक व विचित्र परिस्थितीतून जात असलेला दिसतोय.

तहानभूक विसरून एकदिलाने मार्गक्रमण करणाऱ्या वारकऱ्यांप्रमाणे महाराष्ट्राचीही वाटचाल योग्य मार्गावरून सुखसमृद्धी व शांती समाधानाने पुढे होवो यासाठी हे प्रयोजन.

नगर शहर परिसरात २ ठिकाणी 'शॉर्ट सर्किट'मुळे लागली आग

बालिकाश्रम रस्त्यावर २ दुकाने तर भिंगारमध्ये केक शॉप जळून खाक

नगर - नगर शहर परिसरात २ ठिकाणी शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याच्या घटना सोमवारी (दि.८) घडल्या आहेत. यात शहरातील बालिकाश्रम रस्त्यावरील जाधव मळा येथे पत्र्याच्या शेडमध्ये असलेल्या शुजच्या दुकानाला व फ्रॅब्रिकेशन वर्क शॉपला सोमवारी (दि.२) सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास आग लागली. यात दोन्ही दुकाने पूर्णपणे भस्मसात झाली. तर भिंगार येथे नगर - पाथर्डी रोडवर म्हस्के हॉस्पिटल शेजारी असलेल्या केक शॉपला पहाटे आग लागून दुकानातील साहित्य जळाले आहे.

जाधव मळा येथे एका प्लॉटवर पत्र्याचे शेड मारून त्यात व्यवसाय सुरू होते. सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास वॉक्मेट नावाचे शूज चे दुकान व त्याशेजारी असलेल्या एस. एम. फ्रॅबीकेटर्स या दोन दुकानांना आग लागली. काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले. या आगीत दोन्ही दुकानातील साहित्य, मशिनरी जळून खाक झाले. महापालिकेच्या अग्निशमन दलाला घटनेची माहिती मिळताच दोन बंब घटनास्थळी दाखल झाले. मात्र, बघ्यांच्या गर्दीमुळे मदतकार्यात अडथळे येत होते. रस्त्यावरील वाहतूकही ठप्प झाली होती. माजी महापौर अभिषेक कळमकर व बालिकाश्रम दलाचे प्रमुख शंकर मिसाळ यांनी गर्दी बाजूला करून आग आटक्यात आणली.

भिंगार येथे नगर- पाथर्डी रोडवर म्हस्के हॉस्पिटल शेजारी असलेल्या केकीज केक शॉपला सोमवारी पहाटे १२.३० च्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे आग लागली. या आगीत दुकानातील २ फ्रीज, वाढदिवसाकरिता सजावटीसाठी लागणारे साहित्य, खुर्च्या, सिलिंग फॅन व फर्निचर असे साहित्य जळाले आहे. याबाबत दुकान मालक सत्यशीला मारुती खराडे (रा. वडारवाडी, भिंगार) यांनी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी आकस्मात जळीताची नोंद केली आहे.

नव्याने बदलून आलेले आयुक्त शहरासाठी ठरतील का उपयुक्त?

(पान १ वरून)

फेज दू, अमृत पाणी योजना याचा पूर्णपणे बोजवारा वाजलेला आहे, त्यासाठी उखडलेले रस्ते, अजुनही महिनो न् महिन्यांपासून टक्केवारी वॉर्मुळे पूर्ण होत नाहीत. अगोदर तंबाखू छाप ठेकेदारांकडून केलेले रस्ते आणि नंतर ड्रेनेजच्या झाकणाबाबत झालेला साक्षाटलार. त्यासाठी आता भर पावसात चितळे रोड सारख्या प्रचंड वाहतुकीचे रस्ते उखडले आहेत.

स्वच्छतेच (मॅच फिक्सिंग) मानांकन (?) मिळालेले शहर अस्वच्छतेची राजधानी

खचलेली नवी कोरी (?) ड्रेनेजची झाकणं, आणि सर्वत्र अतिक्रमणाची बोंबाबोंब, या सर्व शहराच्या पाचवीला पुजलेल्या समस्या आपल्यासमोर आहेतच, आपण आता पूर्ण जिल्ह्यात नसतील इतक्या आगगाडीसारख्या लांबच लांब बेकायदेशीर, कुठलाही विकास भार किंवा कर भरत नसलेल्या, स्थानिक नगरसेवक आणि त्यांची भक्त मंडळी यांच्या पत्र्याच्या टप्प्या असलेल्या शहराचे आयुक्त झालाहात.

आमच्या जन्मापासून या महानगरपालिकेची कराची थकबाकी ऐकतो आहोत. ती आता २५० कोटी रुपयांच्या घरात पोहोचली आहे. यापैकी २५% जरी वसुली केली तरी हे शहर व्हॅटिलेटरमधून बाहेर येण्याची शक्यता आहे. पहिले सगळे आयुक्त वेगळ्याच वसुलीमध्ये व्यस्त असल्यामुळे त्यांना यासाठी वेळ मिळालेला नाही.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा असलेल्या या महानगरपालिकेमध्ये आवश्यक क्षमतेच्या ५० टक्के देखील पात्रताधारक कर्मचारी उपलब्ध नाहीत. मागील दोन वर्षात ४५ टक्के कर्मचारी निवृत्त झाले आहेत. नवीन भरतीला परवानगी नही. म्हणजे क्रिकेटच्या मैदानात ११ खेळाडूंच्या ऐवजी फक्त एक बॉलर आणि एक विकेट कीपर असे दोनच खेळाडू घेऊन उतरायचे आहे आणि मॅच जिंकून दाखवायची आहे

आपल्या मनपाचा आकृतीबंधाच्या नियमानुसार प्रशासकीय खर्च ३५% ऐवजी थेट ८०% वर गेला आहे, तो या जन्मात तरी ३५% वर येणार नाही, म्हणून मग या जन्मात तरी पात्र असलेल्या नवीन कर्मचाऱ्यांची भरती होणार नाही आणि काहीतरी दिव्य चमत्कार झाल्याशिवाय अनुशेष भरून काढला जाणार नाही. त्यामुळे जुन्याच अपात्र दगडांना घेवला वेगळा शेंदूर पासून वेगवेळ्या पदांच्या खुर्चीवर बसवून अनागोंदी चालूच राहील, त्यामुळे नागरिकांना कधीच सुविधा मिळणार नाहीत, त्या नाराजीमधून कर संकलन होणार नाही, कर संकलन झाले नही म्हणजे महापालिकेला नेहमीप्रमाणेच भिकेचे डोहाळे लागतील आणि विकास नावाचा शब्द असाच हास्यास्पद विद्रूप आकार घेत राहील. आपण देखील आपल्याला काय एक-दोन वर्ष येथे काढायचे असा विचार करील व अधिक काही विकासाचे धाडसी, तंबाखू छाप समाजसेवकांच पंगा घेणारे निर्णय न घेता असेच एक दिवस बदलून जाल. परत नवीन आयुक्त येतील. परत तेच रडगाणे. या दुष्टचक्रातून आपण कसे या शहराला बाहेर काढणार आहात? यावरच सर्व भवितव्य अवलंबून आहे.

आपण शहराच्या विकासाला टक्केवारी नावाचा जो रोग लागला आहे त्याच्यासाठी काही बूस्टर डोस असलेली लस घेऊन आलात तर बरे होईल, कारण हा टक्केवारीचा रोग कोरोना पेक्षाही भयानक संसर्गजन्य आहे. इच्छुक उमेदवारांना समाजसेवक व्हायचे असते तेच केवळ टक्केवारीसाठी दुसरं काहीच कारण नाही. हे चित्र बदलणे निर्भीड कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याचे काम असते, असे मुळे यांनी म्हटले आहे.

सिद्धार्थनगरमध्ये तरुणाची गळफास घेत आत्महत्या

नगर - राहत्या घरात गळफास घेऊन एकाने आत्महत्या केल्याची घटना नगर शहरातील सिद्धार्थनगर परिसरात सोमवारी (दि.८) सकाळी घडली. निखील सुनिल नवगिरे (वय २६, रा. सिद्धार्थनगर) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

निखील सुनिल नवगिरे याने सोमवारी सकाळी राहत्या घरात गळफास घेतला. सदरची घटना त्यांच्या नातेवाईकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांचा भाऊ केवल सुनिल नवगिरे यांनी त्यास उपचारासाठी सकाळी ६.३० वाजता जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्यांची तपासणी केली असता त्याचा मृत्यू झाल्याचे घोषीत केले. तशी खबर वैद्यकीय अधिकारी डॉ. वाघ यांनी रूग्णालयात ड्यूटीवर असलेले तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार जठार यांना दिली. अंमलदार जठार यांनी दिलेल्या खबरीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

लाडक्या बहिणीसाठी शून्य रुपयात जिल्हा सहकारी बँक खाते उघडणार

चेअरमन शिवाजीराव कर्डिले यांची माहिती

नगर - मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेअंतर्गत महिला भगीनींना रुपये १५०० महिना अनुदान देण्याची घोषणा शासनाने केली असून, या अंतर्गत योजनेमधील महिलांकरिता अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शून्य रुपयात बँक खाते उघडून देणार असल्याची माहिती बँकेचे चेअरमन माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांनी दिली.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजने अंतर्गत महिला भगीनीकडून शासनाने १ जुलै पासून फॉर्म भरण्यास सुरुवात केली असून, यामध्ये बँकेचे खाते असणे आवश्यक असल्याने बँक खाते अभावी महिलांचे नुकसान होवू नये व खाते उघडताना आर्थिक घुर्दड पडू नये यासाठी अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने हा निर्णय घेतला असल्याची माहिती शिवाजीराव कर्डिले, व्हा. चेअरमन अॅड. माधवराव कानवडे व संचालक मंडळ यांनी दिली. अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विस्तार कक्षासह एकूण २९८ शाखांचे जिल्ह्यात मोठे जाळे असून प्रामुख्याने ग्रामीण भागात बँक सर्व खातेदारांना सेवा देत असते. महिलांना आपल्या जवळच्या जिल्हा बँक शाखेत झीरो बॅलन्स (शून्य शिल्लक रक्कम) खाती बँकेच्या सर्व शाखांमध्ये तात्काळ खाते उघडून घेण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. खाते उघडण्यासाठी महिला भगीनींनी खाते उघडण्याचे फॉर्म, दोन फोटो, आधार कार्ड झेरॉक्स इ. आवश्यक कागदपत्राची केवायसी पूर्ण करणे आवश्यक आहे तरी या योजनेचा महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री. कर्डिले यांनी केले.

व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या अल्पसंख्यांक खुल्या प्रवर्गातील मुलींनाही शंभर टक्के सवलत मिळावी

यश शहा

नगर - व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणारे येणाऱ्या अल्पसंख्यांक समाजातील तसेच खुल्या प्रवर्गातील मुलींनाही शंभर टक्के सूट मिळावी, अशी मागणी राष्ट्रीय युवा कार्याध्यक्ष अ. भा.जैन दि.मंच, अल्पसंख्यांक समिती उपप्रमुख अ.भा.जैन बे. गुज. स. महा. इंजि.यश शहा यांनी राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, उच्च व शिक्षण मंत्री जिल्हाधिकारी यांना ई-मेलद्वारे केली

उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन द्वारे घेण्यात आलेल्या शासन निर्णय क्र. शिष्यवृत्त-२०२४/प्र. क्र.१०५/तांशि -४ दिनांक - ८/७/२०२४ यामध्ये समाविष्ट करावे व नवीन याबाबतचे परिपत्रक तात्काळ काढावे ही जैन अल्पसंख्यांक समाजाच्या वतीने मागणी केली आहे.

यश शहा म्हणाले की जेणेकरून नवीन शैक्षणिक धोरणानुसार (NEP) व्यावसायिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढवण्याच्या दृष्टीने व मुलींना सम्प्रमाणात व्यापक संधी प्राप्त व्हाव्यात. तसेच महिला सक्षमीकरणअंतर्गत आर्थिक पाठबळआभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्यापासून मुली वंचित राहू नयेत ही बाब गंभीरतेने विचारात घ्यावी. मागणीचा योग्य तो विचार होऊन तात्काळ या संदर्भात कार्यवाही करण्याचे आदेश संबंधित विभागांना द्यावेत जेणेकरून अल्पसंख्यांक समाजाच्या मुलीही व्यावसायिक शिक्षण घेण्यास सहकार्य मिळेल.

टॅक्टरने मोटारसायकलला धडक दिल्याने महिलेचा मृत्यू

नगर - भरधाव वेगात चाललेल्या टॅक्टरने मोटारसायकलला पाठीमागून जोराची धडक दिल्याने मोटारसायकल वरील महिला रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाली व उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील खातगाव ते टाकळी जाणाऱ्या रोडवर रविवारी (दि.७) सकाळी १०.४० च्या सुमारास घडली.

कुसुम एकनाथ कुलट (वय ४७, रा. खातगाव टाकळी, ता.नगर) असे मयत महिलेचे नाव आहे. मयत कुसुम या त्यांचे पती एकनाथ यादव कुलट यांच्या समवेत मोटारसायकल व चाललेल्या असताना त्यांच्या पाठीमागून एक टॅक्टर भरधाव वेगात आला आणि त्याने त्यांच्या मोटारसायकलला धडक दिली. त्यामुळे कुसुम या रस्त्यावर पडून जखमी झाल्या. डोक्याला जास्त प्रमाणात मार लागल्याने त्या मयत झाल्या. याबाबत त्यांचे पती एकनाथ कुलट यांनी सोमवारी (दि.८) सायंकाळी नगर तालुका पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात टॅक्टर चालकाविरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे.

अभिमन्यू भोसले यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर - घोसपुरी (ता. नगर) येथील अभिमन्यू भगवान भोसले (वय ७३) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. आरपीआयचे (आठवले) तालुका अध्यक्ष अविनाश भोसले यांचे ते वडील होते.

पोपटलाल चंगेडिया यांचे अल्प आजाराने निधन

नगर - देवळाली प्रवरा (ता.राहुरी) येथील रहिवासी पोपटलाल अमरचंद चंगेडिया (वय ६७) यांचे ५ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. ६ रोजी देवळाली प्रवरा येथील अमरधाममध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ते अत्यंत धार्मिक, मनमिळावू व मितभाषी स्वभावाचे होते. त्यांच्या मागे भाऊ, बहिण, भाजजवा, मेहूण, ५ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

मंदाकिनी देशपांडे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - येथील मंदाकिनी पांडुरंग देशपांडे (वय ८३) यांचे ८ जुलै रोजी सायंकाळी ६.३० च्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचा अंत्यविधी सोमवारी (८ जुलै) रात्री १० ते १०.३० या दरम्यान अमरधाम, नालेगाव येथे झाला.



श्रीमती मंदाकिनी देशपांडे या मूळच्या श्रीरामपूर येथील होत्या. त्यांच्या मागे ३ मुले, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पती निधनानंतर खंबीरपणे प्राप्त परिस्थितीचा सामना करीत त्यांनी मुलांना शिकवले व स्वावलंबी केले. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन येथील सविता देशपांडे चॅरिटेबल ट्रस्टने त्यांना २०१९ मध्ये रणरागिणी पुरस्कार देऊन गौरवले होते. क्रिएटिव्ह कम्युनिकेशनचे संचालक व ज्ञानधारा साप्ताहिकाचे संपादक जयंत देशपांडे यांच्या मातोश्री होत.

अहमदनगर जिल्ह्यातील इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेत एका आठवड्यात १८ हजार हून जास्त उघडले खाते

लाडकी बहीण योजनेसाठी लागणाऱ्या बँक खात्यासाठी पोस्टाकडून नागरिकांना मदतीचा हात

नगर - अहमदनगर जिल्ह्यातील सर्वच पोस्ट कार्यालयामध्ये मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेसाठी महिलांना बँक खाते उघडून देण्यासाठी अहमदनगर व श्रीरामपूर येथील पोस्ट विभागाने पुढाकार घेऊन १ ते ८ जुलै पर्यंत जिल्ह्यात इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेचे १८ हजार पेक्षा जास्त खाते उघडून दिलेले आहेत.

पोस्ट कार्यालयामध्ये मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेसाठी बँक खाते उघडण्यासाठी महिलांची झालेली गर्दी छायाचित्रात दिसत आहे.

इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेचे खाते उघडल्यामुळे महिलांना सरकार मार्फत थेट लाभ हस्तांतर योजने अंतर्गत नमूद केलेल्या सर्वच योजनांचा लाभ मिळणार आहे व यासाठी महिला स्वतः जवळच्या पोस्ट कार्यालयामध्ये केवळ आपले आधार कार्ड घेऊन गेल्यास खाते उघडून दिले जात आहे. इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेचे थेट लाभ हस्तांतर सक्षम बँक खाते उघडल्याने पोस्टाच्या देखील अनेक योजनांची माहिती मिळणार आहे महिलांना आर्थिक स्वावलंबी होण्यास मदत होणार आहे.

महिलांनी पोस्ट कार्यालयात जाऊन किंवा पोस्टमन यांच्याशी संपर्क साधून खाते उघडून घ्यावे, असे आवाहन श्रीरामपूर विभागाचे डाक अधीक्षक हेमंत खडकेकर व इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेचे शाखा व्यवस्थापक स्वप्निल सावंत यांनी केले आहे.

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण योजनेंतर्गत पोस्ट कार्यालयांमध्ये खाते उघडण्याची सुविधा उपलब्ध

नगर - भारतीय डाक अहमदनगर विभागासह राज्यातील सर्वच पोस्ट कार्यालयांमध्ये मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण योजनेंतर्गत बँक खाते उघडून देण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. महिलांनी पोस्ट कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन अथवा पोस्टमनशी संपर्क साधून खाते उघडून घेण्याचे आवाहन वरिष्ठ अधीक्षक, डाकघर, नगर यांनी केले आहे.

इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेचे खाते उघडल्यामुळे महिलांना सरकारमार्फत थेट लाभ हस्तांतर योजनेंतर्गत नमूद केलेल्या सर्वच योजनांचे लाभ मिळू शकतात. यासाठी महिलांनी जवळच्या पोस्ट कार्यालयामध्ये केवळ आपले आधारकार्ड व मोबाईल घेऊन गेल्यास खाते उघडून दिले जाणार आहे. इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेचे थेट लाभ हस्तांतर सक्षम बँक खाते उघडल्याने महिलांना आर्थिक स्वावलंबी होण्यास मदत होणार असल्याचेही प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

महाराष्ट्र सरकारने १ रुपयात पीकविम्याच्या नावाने १० हजार कोटी रुपये विमा कंपन्यांच्या घशात घातले

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सरणावर ढकलले, शेतकऱ्यांच्या आंदोलनात अखिल भारतीय किसान सभा दुध उत्पादक उतरणार, बैठकीत निर्णय

नगर - देशातील शेतकरी असंतोषामुळे भाजप सरकारला एकहाती बहुमत गमवावे लागले. दोन पक्षांच्या कुबड्या घेऊन नरेंद्र मोदी यांचे सरकार सत्तेवर चढले आहे. अशा परिस्थितीत शेतकरी असंतोषातून भाजपला फटका बसलेला असताना देखील शेतकरी द्वेषाचे अर्थकारण बदलले नाही. महाराष्ट्र सरकारने राज्यात एक रुपयात पीकविमा या नावाने १० हजार कोटी रुपये विमा कंपन्यांच्या घशात घालून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सरणावर ढकलले. तर शेतकऱ्यांना केवळ सरासरी ६.८ टक्के अत्यंत तुटपुंजी शेतमालाच्या भावामध्ये वाढ देऊन शेतकऱ्यांशी आर्थिक युद्ध चालूच ठेवले असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय किसान सभेचे राज्य सरचिटणीस कॉ. राजन क्षीरसागर यांनी केले.

अखिल भारतीय किसान सभेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक

अखिल भारतीय किसान सभेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक कॉ. क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली बुरुडगाव रोड येथील भाकपच्या पक्ष कार्यालयात पार पडली. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी कॉ. अॅड. सुभाष लांडे, किसान सभेचे जिल्हा सेक्रेटरी कॉ.डी. बन्सी सातपुते, राज्य कौन्सिल सदस्य कॉ. गुगल रायलू, संतोष खोडदे, बापूराव राशिनकर, अॅड. सुधीर टोकेकर, कॉ. संजय नांगरे, कॉ. बबनराव सालके, आप्पासाहेब बाबळे, अॅड. रमेश नागवडे, लक्ष्मण नवले, कैलास शेळके, यलुबा नवले, धोंडीभाऊ सातपुते, भगवान गायकवाड, सुरेश पानसरे, श्रीधर आदिक, बबनराव पवार, अॅड. भागचंद उकर्डे, सुलाबाई आदमाने, दशरथ हासे, अशोक दुबे, ज्ञानदेव साहाने, प्रताप साहाने, भारत अरगडे, लता मेंगाळ, निवृत्ती दातीर, रामदास वागस्कर, बाबासाहेब सोनपूरे, संदिप इथापे, लक्ष्मण शिंदे, रघुनाथ पवार, किसन गंभीरे, सुरेश बागूल, प्रकाश नवले, गोरक्षनाथ काकडे, प्रशांत आरे आदी उपस्थित होते.

पुढे कॉ. क्षीरसागर म्हणाले की, नापीकी आणि कर्जबाजारी झालेल्या २९८५ शेतकऱ्यांचा आत्महत्या २०२३ सालात घडल्या आहेत. एका शेतकरी आत्महत्ये मागे ३ कोटी रुपये फायदा विमा कंपन्यांनी कमावला आहे. खरीप २०२३-२४ मध्ये जोखीम रकमेच्या केवळ ६.२१ टक्के आणि रब्बी हंगामात ०.२१ टक्के इतक्या अल्प प्रमाणात पीकविमा भरपाई अदा करुन हजारो शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तर हजारो टन दूध पावडर आयात करण्याचा निर्णय घेऊन दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळले असल्याचा आरोप त्यांनी केला.

या बैठकीत दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या सुरू असलेल्या आंदोलनातील मागण्यांसाठी किसान सभा सक्रीय पाठिंबा देत असल्याचे जाहीर करण्यात आले. नगरसह सर्व जिल्ह्यात किसान सभा रस्त्यावर उतरून विविध शेतकऱ्यांच्या मागण्यावाबत सरकारला जाब विचारणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

महाराष्ट्र सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाविरुद्ध लवकरच राज्यव्यापी आंदोलन पुणे येथे कृषी आयुक्त सेंट्रल बिल्डींगला घेराव घालून करण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला.

यावेळी किसान सभेच्या जिल्हा अध्यक्षपदी कॉ. बबनराव सालके तर जिल्हा सेक्रेटरीपदी कॉ. अप्पासाहेब बाबळे यांची निवड करण्यात आली.

गृहिणी

आरोग्य

बहुपयोगी जांभूळ

शरीराला जखम झाल्यास वा खरचटल्यास जांभळाची पाने लावावीत. त्यामुळे रक्त थांबते. दातातून रक्त येत असल्यास जांभळाची सालं बारीक करून त्यांचे मंजन करावे आणि दातांना लावावे. त्यामुळे दात दुखीला उतारा मिळतो. हाता-पायांची जळजळ होत असल्यास पिकलेल्या जांभळाचा रस लावावा. नक्की फरक पडतो.

पाककला

पिठी साखरेचे चिरोटे

साहित्य – अर्धा किलो मैदा, चवीपुरते मीठ, अर्धी वाटी डालडा, पाणी, अर्धा लिटर दूध, तळण्यासाठी तेल, पाव वाटी तांदळाची पिठी, बेकिंग पावडर, पिठी साखर अर्धी वाटी.

कृति – प्रथम मैदा चालून घ्यावा. त्यात डालडा गरम करून पाव वाटी टाकावा. पाव चमचा बेकिंग पावडर, मीठ घालून दूध घालावे व चपातीच्या कणकेप्रमाणे भिजवावे. नंतर एका ताटात उरलेला डालडा व तांदळाची पिठी फेसून ठेवावी नंतर मैद्याच्या छोट्या छोट्या गोळा करणे व लाटणे व प्रत्येक चपातीला तांदळाची फेसलेली पिठी लावून एकावर एक ठेवणे व वळकटी करणे व गोलगोल आप करावेत व ते गोल काप अलगदपणे लाटावेत. नंतर तेलात चिरोटे तळून घ्यावेत. गरम असतानाच त्यावर पिठीसाखर पेरावी.

सल्ला

साखरेतील मुंग्या अशा काढा

* साखरेत जर जास्त मुंग्या झाल्या असतील व सहजतेने बाहेर निघत नसतील तर साखरेच्या डब्यात कापराचा एक तुकडा ठेवल्यास मुंग्या स्वतः होऊन बाहेर पडतील.फणस कापण्यापूर्वी तो प्लॅस्टिक पिशवीत ठेवून पाच-सहा तास फ्रीजमध्ये ठेवा. यानंतर फणस कापल्यास फणसाचा दुधट चिकटपणा नाहीसा होतो.
* आपल्या किचनचा ओटा तेलकट व चिकट झाला असेल त्यावर फडक्याने रॉकेल चोळा व तासभरानंतर एखाद्या डिटर्जंट पावडरने गरम पाण्याने धुवा. ओटा नव्यासारखा चमकू लागेल.
* पुलाव बनवताना तांदळात थोडा लिंबाचा रस मिसळावा. पुलाव फडफडीत होईल.

वास्तू

* शयनगृहाच्या नैऋत्येचा कोपरा रिकामा ठेवू नये. तेथे शोभेच्या वस्तू आकर्षक असे दिवे, सिरॅमिक पॉट ठेवावेत.
* हॉलच्या पूर्वेकडील भिंतीवर उत्तुंग पर्वत शिखराचे व उत्तरेकडील भिंतीवर डोंगरदऱ्यातून झुळूझुळू वाहणाऱ्या निर्झराचे किंवा उंचावरून खाली झोपावणाऱ्या धबधब्याचे पोस्टर लावा. या योगे तुमच्या प्रसिद्धीत व नावलौकिकात वाढ होते, असा माझा अनुभव आहे.

सौंदर्य

* आठवड्यातून एकदा चेहऱ्याची त्वचा साफ केली की त्वचेवर राप चढत नाही. तांदळाची पिठी ताकात घालून ते मिश्रण चेहरा, गळा, मान यावर लावा. सुकल्यानंतर धुऊन काढावे.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

बुधवार, दि. १० जुलै २०२४

---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, मघा १०।५५ सूर्योदय ०६ वा. २७ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.

राशिभविष्य

मेष : आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय आपणास अस्वस्थ करेल. पोरकटपणा करणे टाळाल. इतरांवर चुकीचा प्रभाव पडेल.

वृषभ : एखादी विषम परिस्थिती उद्‌भवण्याआधी आपली आर्थिक स्थिती तपासून स्थिती पाहाल. इतर लोकांबरोबर काही विषयांवर संमती द्यावी लागू शकते.

मिथुन : रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. करीयर संदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता. व्यापार-व्यवसाय सहज होत राहील. कौटुंबिक सभासदांचा सहयोग मिळेल.

कर्क : निष्कारण प्रश्नांचा त्रास राहील. आरोग्याची काळजी घ्याल. व्यापार व्यवसायात वेळ साधारण राहील. हसत खेळत वेळ खर्च होईल. घरातील वातावरण आनंददायी राहील.

सिंह : ठरविलेले पूर्ण करण्यासाठी अपेक्षे प्रसंग प्रेरणादायी ठरतील. यथायोग्य विचार करून कार्य कराल. सुख-शांतीचे वातावरण राहील.

कन्या : ज्यांच्याबरोबर आपणास वेळ घालवणे आवडते त्यांना वेळ द्याल. कामांसाठी श्रम करावे लागेल. आर्थिक विषयांमध्ये सावगिरी बाळगाल. बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील.

तूळ : अधिक चांगली कामाची स्थिती आहे आणि सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी चांगली वेळ आहे. आपल्या व्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोन प्रदर्शित करा.

वृश्चिक : आजचा दिवस आपल्या कार्य-योजनेंसाठी आणि सहकार्यां बरोबर आपल्या संबंधांसाठी विधायक ठरेल. कार्यात यश मिळविण्यासाठी आपले मत ठामपणे मांडाल.

धनु : मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. आपण जे करण्याची इच्छा ठेवता ते सुरुवातीपासून ठरवून घ्याल.

मकर : आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल.

कुंभ : सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील व मान-सन्मान वाढेल. नवीन जोखिम असलेली कार्ये टाळाल. मातृपक्षाकडून प्रसन्नता राहील.

मीन : आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो. वाहने व उपकरणे चोरी जाण्याची शक्यता.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

शब्दगंध क्र. ६९६३ सौ.शैलजा कुलकर्णी

शब्दगंध क्र. ६९६२ चे उत्तर

उभे शब्द :– १) या गावात संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' रचल २) मासा; बारा राशींपैकी एक ३) चालू स्थितीत; वर्तमानकाळी ४) उसाचा घट्ट कढविलेला रस ७) मोठा; थोर; महान ९) वेळ; कालावधी; विलंब; उशीर ११) अंगावरुन वारे जाणे; पक्षघात; अर्धांगवायू १२) भाट; स्तुतिपाठक १३) कणखर; दणकट; मजबूत १४) माणुसकी १६) सोबत; बरोबर; संगत १७) केशवर्धक तेल देणारी एक वनस्पती १९) अट; शर्त; परंतु २१) एक हजार किलो किंवा दहा क्विंटल वजनाचे माप

आडवे शब्द :– १) हमेशा; सतत ४) आजच्या आदला दिवस ५) मुस्लिमांची प्रार्थना ६) सलोखा ; समेट; तह; एक वेद ८) व्याकूळ १०) चलनवलन; चळवळ १३) बागकाम करणारा; फुलधर; माळी १४) आई; जननी; माता १५) किराणा दुकानातून आणलेल्या वस्तू १८) चहा पिण्याचे एक भांडे; बशीचा जोडीदार २०) ग्लानी; मरगळ; शीण २२) बाण सोडल्यानंतर धनुष्याच्या दोरीचा येणारा आवाज २३) गायनात निरनिराळ्या सुरांनी केलेला रागाचा विस्तार

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : स्तुती म्हणजे अज्ञानाची कन्या आहे. – **फ्रँकलिन.**

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

कॅटस्कॅन म्हणजे काय?

''एक्स-रे झाला, सर्व तपासण्या झाल्या... मग शेवटी डॉक्टरांनी स्कॅन करायला सांगितला... तेव्हा मग रोगाचे निदान झाले.'' अशा प्रकारची वाक्ये केव्हातरी आपल्याला ऐकायला मिळतात. यावरुन स्कॅन म्हणजे रोगनिदानाची एक पद्धत आहे आणि इतर पद्धतीपेक्षा ती सरस आहे, असा समज अनेकांच्या डोक्यात नक्कीच पक्का झाला असेल.

कॅट स्कॅन म्हणजेच कॉम्प्युटराइझ्ड टोमोग्राफीक स्कॅन, क्ष-किरणांचा वापर करुन या पद्धतीत शरीराच्या वेगवेगळ्या भागांची संगणकाच्या सहाय्याने आलेखने घेतली जातात. क्ष-किरण छायाचित्र व स्कॅन यात खूप फरक असतो. स्कॅनमध्ये शरीराच्या कोणत्याही भागाचे पृष्ठभागापासून कितीही अंतरावरचे (जसे त्वचेपासून दोन इंच आत वगैरे...) छायाचित्र घेता येते. अवयवांच्या उभ्या किंवा आडव्या छेदांची छायाचित्रे मिळू शकतात. मुख्य म्हणजे या पद्धतीत शरीराच्या आत काही रासायनिक पदार्थ वा नळी इ. टाकावे लागत नसल्याने कोणताच धोका होत नाही. अर्थात क्ष-किरणांच्या वापरामुळे काही दुष्परिणाम होऊ शकतात.

मेंदूमधील कर्करोगाच्या गाठी, रक्तवाहिन्यांवरील गाठी, रक्तस्रावामुळे तयार झालेल्या गाठी आदींचे निदान स्कॅनमुळे सहजगत्या होऊ शकते. ५ मि.मी. पेक्षा मोठ्या गाठीच या पद्धतीने दिसू शकतात. शरीराच्या इतर भागातील कर्करोग किंवा अंतर्गत शारीरिक वैगुण्यांचे निदान स्कॅनमुळे होऊ शकते.

कॅट स्कॅन हे रोगनिदानासाठी डॉक्टरांच्या हाती सापडलेले प्रभावी साधन होय. पण ही तपासणी खर्चिक आहे. एका स्कॅनसाठी १५०० ते २००० रु. खर्च येतो. साहजिकच या रोगनिदान पद्धतीचा सुयोग्य व नेमकाच वापर होण्याची गरज आहे. उठसूट स्कॅन करण्याने फारसे काही साध्य होणार नाही. विशेषतः साध्या क्ष-किरणाने निदान होणाऱ्या गोष्टींसाठी स्कॅन काढणे म्हणजे उंदीर मारायला तोफ आणण्यासारखेच आहे!

मुंगुसाची बतावणी

आपल्या घरात मुंगूस घुसले आहे, असे पाहताच घराच्या मालकाने शिताफीने मुंगुसाला पकडले. तो त्याचा जीव घेणार, तोच त्याची विनवणी करीत मुंगूस म्हणाले, '' बाबा रे, मला विनाकारण ठार मारु नकोस. खरे तर मी तुझ्यावर उपकारच करतो. तुझ्या घरातले उंदीर तुझे धान्य खातात. त्या उंदरांना मी मारुन खातो. असे असता उपकार विसरून तू मलाच ठार मारू पाहतोस? वा रे तुझा न्याय?''

त्यावर घराचा मालक म्हणाला, ''अरे लबाडा, माझ्यावर कसले उपकार करतोस रे. स्वतचे पोट भरण्यासाठी तू, उंदीर मारून खातोस, त्यासाठी माझ्या घराची जमीन इथे? तिथे खोदून ठेवतोस. याचा मला किती त्रास होतो आहे, याचा तू कधी विचार केला आहेस काय? आणि वर मलाच न्याय शिकवतोस. थांब आता, तुला ठार केल्याशिवाय मी तसा सोडणार नाही. '' असे म्हणत घरमालकाने मुंगुसाला जमिनीवर आपटून ठार केले.

तात्पर्य : स्वतःच्या फायद्यासाठी केलेले कृत्य हा दुसऱ्यावर उपकारच आहे, असे समजणे हे लबाडीचे वर्तन होय.

जीवन चक्र

आम्ही असा प्रयत्न करावा की आम्ही ह्या प्रसंगांना शांततेने सामोरे जावे आणि आपल्या जर्जा जी शक्यतो तक्रारी करण्यामध्ये खर्च होते तिला वाचवावी. उर्जा खर्च करू नये. त्याऐवजी आम्ही प्रेम आणि कृतज्ञतेने परमात्म्याचे घ्यान करावे. आमच्या असे लक्षात येईल की आम्ही कठीण प्रसंगातून अधिक सहजतेने बाहेर पडतो किंवा आमचा कठीण वेळ सहज पार केला जातो. अयाजप्रमाणे परमात्म्याकडून मिळणारी प्रत्येक भेट (देणगी) आम्ही गोड मधूर समजावी. आमचे संपूर्ण जीवन आणि आमच्या आजूबाजूच्या लोकांचे जीवन आनंदी होईल. कोणत्याही क्षेत्रात यश मिळविण्यासाठी आम्ही एकाग्र होणे गरजेचे आहे. आम्हाला डॉक्टर व्हायचे असो, सर्वोत्तम क्रिडापटू व्हायचे असेल, महान गायक व कलाकार व्हावयाचे असो, आम्हांला ध्येय सिध्दीसाठी पूर्णपणे एकाग्र होण्याची आवश्यकता आहे. ज्या व्यक्तिने जीवनात मोठे यश संपादन केले त्यांचे जीवन पहा. आम्हांला दिसून येईल की, त्यांच्यामध्ये ध्येयप्राप्तिसाठी अनन्य प्रेम होते.

आध्यात्मिक विकासाचे क्षेत्रातही वेगळे असे काहीच नाही. हे महत्त्वाचेच आहे की जेव्हा आम्ही ध्यानाभ्यास करू तेव्हा तो एकाग्रतेने केला पाहिजे. स्वतःला जाणण्यासाठी ध्येयावर पूर्ण ध्यान, लक्ष असले पाहिजे. महान सुफी संत बायजीद बुस्तामीच्या जीवनातील एक गोष्ट आहे. एकदा ते आपल्या आध्यात्मिक गुरूच्या जवळ बसलेले होते. गुरूजींने त्यांना खिडकीजवळ ठेवलेले एक पुस्तक घेऊन येण्यास सांगितले.

बुस्तामींनी विचारले कोणती खिडकी? खिडकी कोठे आहे? गुरूजींना खुपच आश्चर्य वाटले व ते म्हणाले, हे कसे काय? की कित्तीतरी वर्षे तुम्ही मला भेटावयास येताात आणि तुम्हांला खिडकी कोठे आहे हे माहित नाही? शिष्याने उत्तर दिले मी आपल्या खिडकीकडे का ध्यान द्यावे? जेव्हा मी आपल्या बरोबर असतो तेव्हा मी फक्त आपल्यालाच पाहत असतो. मी आपल्या खेरीज इतर वस्तुंकडे दृष्टीक्षेप करत नाही. गुरूजी हसले आणि म्हणाले,

''आता तुम्ही घरी जाउं शकता. माझ्याकडील आध्यात्मिक शिक्षणाचा तुमचा पाठ्यक्रम पुर्ण झालेला आहे. तुम्ही आपले ध्येय साध्य केले आहे.

जेव्हा आम्ही आपल्या आत्म्याच्या व प्रभुच्या शोधात असतो तेव्हा आम्ही त्याकडेच ध्यान दिले पाहिजे, इतर बाबींकडे नव्हे. जेव्हा आम्ही प्रभुच्या संपर्कात असतो त्यावेळी आमचे लक्ष दुसरीकडे विचलित होऊ देऊ नये. आम्ही प्रभुची मदिरा तन्मयतेने प्राशन केली पाहिजे व त्याने स्वतः आनंदविभोर होऊन गेले पाहिजे.

(कृपाल आश्रम, अहमदनगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र

किसानों को दुःखी-अशान्त करने का एक कारण हैं व्यसन । व्यसनों के कारण किसानों के परिवार दुःखदाई जीवन जी रहे हैं। मेरे ससुर जी इश्वतदार सफल किसान होते हुए भी मेरे पति शराब और तम्बाकू के व्यसनाधीन थे। दिन-रात व्यसनों में डूबे रहने से वो खेती से तो दूर ही रहते थे पर अच्छी-खासी नौकरी से भी हाथ धोना पड़ा। उनके गलत व्यवहार और अपशब्दों से पूरा परिवार परेशान था। मेरी हालत तो पिंजरे में फंसे पंछी की तरह थी। घर की इज्जत की वजह से ना मैं घर छोड़कर जा सकती और ना ही इस शराबी के अत्याचार को सहन कर पाती थी। समाजसेविका और उप-सरपंच होने के कारण एक दिन जब गोवा के मुख्यमंत्री और उनके साथियों के साथ हमारे घर पर ही विशेष सभा थी, तब मेरे शराबी पति अस्त-व्यस्त कपड़े और हाथ में शराब की बोतल लेकर अन्दर आये और नशे में उनके साथ गलत व्यवहार किया तब मैं शर्म से पानी-पानी हो गई। परिवार की कोई भी जिम्मेवारी उठाने के लिये वो नाकामयाब थे। तंग होकर दो बार आत्महत्या का भी प्रयास किया पर छोटे-छोटे तीन बच्चों की स्मृति से इरादा बदल दिया। उनको व्यसनों से छुड़ाने के कई उपाय किये जैसेकि हवन किया, तीर्थयात्राएँ की, उपवास किये, मंत्र जाप किया, किसी माता के अन्दर देवी आती है तो उनके पास भी ले गई, ३०० सीढ़ियाँ चढ़कर एक देवी के मन्दिर में मुर्गे की बलि भी चढ़ाई पर फिर भी व्यसन नहीं छूटे। फिर ७ हजार रुपये भरकर कृपा फाउण्डेशन (शराब छुड़ाने वाली संस्था) में भी रखा लेकिन जिस दिन वे वहाँ से बाहर आये तो सबसे पहले सीधे दारू की दुकान में गये। यहाँ सिखाये जानेवाले राजयोग के व्यसन से स्वयं के विचारों का परिवर्तन हुआ। भय, चिंता से मुक्त हो गई। यौगिक खेती करने से आंतरिक शक्तियों का प्रयोग करना सीखा तो परमात्म शक्तियों के अनुभव होने गये तब मैंने अपने पति पर भी योग का प्रयोग करना शुरू किया। करीबन ३ महीने प्रयोग करने के बाद उनके संस्कार बदलने लगे और एक दिन जब मैंने सहज ही उनसे पूछा कि क्या आप राजयोग का ७ दिन का कोर्स करेंगे? तो उन्होंने तुरंत हाँ कर दी। जिस दिन से कोर्स शुरू किया उन्होंने शराब पीना बन्द कर दिया। धीरे-धीरे तम्बाकू भी छूट गयी। राजयोग से आत्मजागृति हुई, परमात्मा से सम्बन्ध जुट गया और ४ साल में उनका ऐसा परिवर्तन हुआ कि आज वो घर के, खेती के हर कार्य में सहयोग देते हैं। इतना ही नहीं घरों के नज़दीक ही गीता पाठशाला में ईश्वरीय महावाक्य (मुरली) भी सुनाते हैं। आज मेरा घर जैसे स्वर्ग बन गया है।

आज एक ओर जहाँ हजारों अन्नदाता किसान कर्ज, प्राकृतिक आपदाओं, भय, चिंता, मानसिक तनाव की वजह से रोगी, व्यसनाधीन होते दिखाई दे रहे हैं, आत्महत्या जैसे मार्ग को अपना रहे हैं, वहीं दूसरी और शाश्वत यौगिक खेती करनेवाले हजारों किसान राजयोग के अभ्यास से सहनशक्ति,

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

एक कंजुष माणूस आपल्या मित्राला म्हणाला, 'काय करु रे !... आज मला कंगवा विकत घेतलाच पाहिजे.''का रे ?' 'माझ्या जुन्या कंगव्याचा एक दात तुटला.' मित्र म्हणाला, अरे कंगव्याला कितीतरी दात असतात. त्यातला एखादा तुटला म्हणून सबंध कंगवाच टाकून देऊन नवा घेण्याचं कारण नाही.' 'नाही रे !...' कंजुष माणूस म्हणाला, 'काल जो दात तुटला तो त्या कंगव्यातला शेवटचा दात होता.'

रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्लीश)



या विश्वाचा काही एक
थांगपत्ता लागू शकणार नाही
अशा समुद्रकिनाऱ्यावर
मुले एकमेकांना भेटतात

मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर
मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,
मिंगार मो. ९४०३७३४२८१

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

८) एका स्तनात कर्करोग झालेला असेल तर

९) गर्भाशय, बीजकोष यांचा कर्करोग झालेला असेल तर

१०) व्यसनांमुळे फुफ्फुसाचा कर्करोग झालेला असेल तर

११) उत्सर्जित किरणांच्या (रेडिएशनच्या) संपर्कात दीर्घकाळ असणाऱ्या स्त्रियांमध्ये ६ वरीलपैकी काहीही नसले तरी कर्करोग आढळू शकतो.

कर्करोगाच्या तपासण्या –

महिन्यातून एकदा स्त्रीने स्वतःच्या हाताने आणि चाळिशीनंतर वर्षातून एकदा स्त्रीरोग तज्ज्ञाकडे जाऊन स्तनांची तपासणी करुन घ्यावी. त्यांना लक्षण आढळल्यास स्तनांची सोनोग्राफी किंवा मॅमोग्राफी करुन घेतात.

१) सोनोग्राफी : स्तनांच्या कर्करोगाचे निदान करण्यासाठी सोनोग्राफी फारशी उपयोगी पडत नाही. कारण यामध्ये फक्त गाठ असल्याचे कळते. मात्र कर्करोगाची गाठ आहे की साधी याचे निदान होत नाही. म्हणून शक्यतो मॅमोग्राफी करावी.

२) मॅमोग्राफी :

यांमध्ये अतिशय कमी प्रमाणात क्ष-किरणांचा वापर करुन स्तनांचे फोटो काढतात. त्यामध्ये अगदी लहान गाठही दिसून येते व ती कशाची आहे याचे निदान होते. स्तनांच्या इतर काही सम स्त्यांचे निदान मॅमोग्राफीमध्ये होते. घरापासमध्ये कर्करोगाचा इतिहास असलेल्या स्त्रियांनी वर्षातून एकदा चाळिशीनंतर मॅमोग्राफी करुन घ्यावी. यामुळे प्राथमिक अवस्थेतच कर्करोगाचे निदान होते. त्यावर वेळीच उपचार करता येतात.

३) बायोप्सी : यामध्ये स्तनातील गाठीचा तुकडा काढून सूक्ष्मदर्शक यंत्राद्वारे तपासणी केली जाते. या तपासणीमध्ये गाठ कर्करोगाची आहे की नाही याचे निदान केले जाते.

उपचार : वरील तपासण्यांद्वारे स्तनाच्या कर्करोगाची अवस्था समजते. त्यानुसार डॉक्टर कर्करोगावरील उपचार ठरवतात. पुढील उपचारांद्वारे कर्करोग आटोक्यात येऊ शकते.

१) शस्त्रक्रिया २) रेडिओथेरपी / रेडिएशन अर्थात क्ष-किरण ३) केमोथेरपी

कर्करोग प्राथमिक अवस्थेत असल्यास पूर्ण बरा होऊ शकतो. दुसऱ्या किंवा गंभीर अवस्थेत असेल, तर वरील उपचारांचाही उपयोग होत नाही. म्हणून न लाजता वेळीच तपासणी करावी.

(क्रमशः)

– डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

जिल्हा वाचनालयाच्या सावेडी शाखेस आ. सत्यजित तांबे यांनी सदिच्छा भेट प्रसंगी यावेळी उपाध्यक्ष दिलीप पांढरे, संचालिका प्रा.ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ, चंद्रकांत पालवे, अमोल इथापे, नितीन भारताल, इंजि. रविंद्र थिगळे, किशोर मरकड, सौ.सारिका देव, पुनम गायकवाड आदि. (छाया – सुरेश मैड)

जिल्हा वाचनालय व वाचन चळवळ समृद्ध करण्यासाठी सर्वोतोपरि प्रयत्न

आ.सत्यजित तांबे यांचे प्रतिपादन; अहमदनगर जिल्हा वाचनालय सावेडी शाखेस सदिच्छा भेट

नगर – सुदृढ, संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी अहमदनगर जिल्हा वाचनालयाचा द्विशतकीय वारसा हा अभिमानास्पद व लोकाभिमुख आहे. अ.नगर जिल्हा वाचनालयाही ही वाचन चळवळ समृद्ध करण्यासाठी आपण सर्वतोपरि प्रयत्न करु, असे प्रतिपादन आ. सत्यजित तांबे यांनी केले.

अहमदनगर जिल्हा वाचनालय सावेडी शाखेच्या मातोश्री यमुनाबाई त्रिंबक देशमुख ग्रंथालयास सदिच्छा भेट प्रसंगी आ.तांबे बोलत होते. यावेळी उपाध्यक्ष दिलीप पांढरे, प्रकल्पाच्या समन्वयक व संचालिका प्रा.ज्योती कुलकर्णी, संचालिका शिल्पा रसाळ, कवी चंद्रकांत पालवे, ग्रंथपाल अमोल इथापे, सहा.ग्रंथपाल नितीन भारताल, इंजिनिअर रविंद्र थिगळे, मसपाचे किशोर मरकड, वाचनालयाच्या सौ.सारिका देव, पुनम गायकवाड उपस्थित होते.

आ.तांबे यांनी यावेळी सावेडी शाखेच्या आधुनिक स्पर्धा परिक्षा केंद्र व सुविधांसाठी आपण मदतीस कटिबद्ध असल्याचे सांगितले.

प्रा.ज्योती कुलकर्णी यांनी यावेळी बोलतांना युवा पिढीचे सक्षम नेतृत्व व आधुनिकीकरणाची कास असलेले आ.सत्यजित तांबे यांच्या प्रयत्नातून वाचक नगरकरांना मोठी मदत मिळणार असल्याचे सांगितले.

यावेळी जिल्हा वाचनालयाच्यावतीने आ.सत्यजित तांबे याचा सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक शिल्पा रसाळ यांनी केले तर आभार अमोल इथापे यांनी मानले. यावेळी कर्मचारी कु. साक्षी पन्ना, दिपाली कल्याणम् उपस्थित होते.

स्पर्धेत टिकण्यासाठी विद्यार्थ्यांमधील कला-कौशल्य विकसीत करावे

दादाभाऊ कळमकर यांचे प्रतिपादन; लक्ष्मीबाई भाऊराव पाटीलच्या पालक शिक्षक सहविचार सभेला पालकांचा प्रतिसाद

नगर – स्पर्धेत टिकण्यासाठी पारंपारिक शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांमधील कला-कौशल्य विकसीत करावे लागणार आहे. पालक व शिक्षकांनी मुलांमधील वेगवेगळ्या क्षमता, कलागुण व कौशल्य ओळखून त्या दृष्टीकोनाने त्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. सुरुवात ही कशाने करावी लागते, कशाशिवाय कोणीही पुढे जाऊ शकत नाही. मुलांनी स्वतःचे काम स्वतः केले पाहिजे. मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करुन त्यांचे मार्गदर्शक झाल्यास त्या मुलांचे भवितव्य उज्वल असल्याची भावना श्यत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर यांनी व्यक्त केली.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयातील पालक शिक्षक सहविचार सभेप्रसंगी मार्गदर्शन करताना दादाभाऊ कळमकर. व्यासपीठावर नवनाथ बोडखे, ज्ञानदेव पांडुळे, अभिषेक कळमकर, मुख्याध्यापक शिवाजीराव लंके आदी. दुसऱ्या छायाचित्रात सभेला उपस्थित असलेले पालक-शिक्षक.

शहरातील श्यत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाची पालक शिक्षक सहविचार सभेत मार्गदर्शन करताना कळमकर बोलत होते. लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात पार पडलेल्या या सभेसाठी नवनाथ बोडखे, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, जनरल बॉडी सदस्य अभिषेक कळमकर, अर्जुन पोपळकर, श्याम व्यवहारे, कैलास गुंजाळ, जयद्रथ खाकाळ, अंबादास गारुडकर, तुषार साठे, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजीराव लंके, माध्यमि कच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे आदींसह शालेय शिक्षक व पालक उपस्थित होते.

प्रास्ताविकात मुख्याध्यापक शिवाजी लंके यांनी पालक-शिक्षकांमधील विद्यार्थी हा दुवा आहे. विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षक व पालकांमध्ये समन्वय अत्यंत महत्त्वाचा आहे. यासाठी पालक शिक्षक संघ महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अभिषेक कळमकर म्हणाले, स्पर्धेच्या युगात अवांतर वाचनावर विद्यार्थ्यांनी भर द्यावा. वाचनाने मन एकाग्र व बुध्दी प्रगल्भ होते. आपला मुलगा ज्या वर्गात शिकत आहे त्या वर्गशिक्षकांशी पालकांनी संवाद साधणे आवश्यक असून, मुलांमधील उणीवा लक्षात घेऊन त्या दृष्टीने त्यांना मार्गदर्शन देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ज्ञानदेव पांडुळे म्हणाले, विद्यालयात सर्वसामान्यांची मुले शिक्षण घेऊन आपली गुणवत्ता सिध्द करत आहे. फास्टफुडच्या युगात मुलांना डब्यामध्ये पौष्टिक आहार देण्याची गरज. बौद्धिक विकासाबरोबरच शारीरिक विकास देखील महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. अर्जुन पोपळकर यांनी कुटुंब विभक्त होत गेल्याने संस्काराची गरज भासत आहे. पालक व शिक्षकांनी योग्य भूमिका पार पाडल्यास संस्कारी पिढी घडणार असल्याचे सांगितले.

नवनाथ बोडखे म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण बदलले असून, विद्यार्थ्यांपुढे नवीन आव्हाने व संधी निर्माण झाली आहेत. मुलांसह पालक देखील डिजीटल साक्षर होणे गरजेचे आहे. मुलांना खरे संस्कार व शिक्षणाची आवड निर्माण करणारी आई असते. गुणांच्या बरेजेल मुलांची गुणवत्ता तरवू नये. प्रज्ञाचा शोध घेऊन मुलांचा विकास साधण्याचे त्यांनी आवाहन केले.

या पालक शिक्षक सहविचार सभेत शाळेसंबंधी विविध प्रश्न, समस्या व शैक्षणिक उपक्रमाबद्दल चर्चा करण्यात आली. शिक्षक-पालक संघासाठी वर्ग वर्गातील प्रतिनिधींची निवड या मेळाव्यात करण्यात आली. या कार्यक्रमासाठी पालक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रदीप पालवे व सुजाता दोमल यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतोसाठी मीनाक्षी खोडदे, उर्मिला साळुंखे, अमित धामणे यांनी परिश्रम घेतले.

बुरुडगावात रंगला अश्वरिंगण सोहळा, पायी दिंडीचे श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान

जिल्हाधिकारी यांच्या पत्नी सौ. मीनाक्षी सालीमठ यांचे दिंडीतील महिलांसह फुगड्यांचा फेर; ज्ञानोबा-तुकोबांच्या जयघोषात व टाळ मृदंगाच्या गजराने ग्रामस्थ भारावले

नगर – बुरुडगाव (ता. नगर) येथील श्री क्षेत्र बुरुडगाव पायी दिंडीचे श्री क्षेत्र पंढरपूरला आषाढी वारीसाठी प्रस्थान झाले. गावात सकाळी ज्ञानोबा-तुकोबांच्या जयघोषात व टाळ मृदंगाच्या गजराच्या भक्तीमय वातावरणात ढोळे दिपवून टाकणारा अश्वरिंगण सोहळा पार पडला. वैष्णवांच्या मेळ्यातून माऊली... माऊली... च्या गजरात पालखी भोवती धावलेल्या अश्वाने ढोळ्यांचे पारणे फेडले. वारकऱ्यांना सर्वांचिक सुविधा पुरवणारी दिंडी म्हणून या दिंडीकडे पाहिले जाते.

प्रारंभी आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते दिंडीतील रथाचे पूजन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी यांच्या पत्नी मिनाक्षी सालीमठ, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, नगर तालुका पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गीते, दिंडी नियोजन समितीचे डॉ. संतोष यादव, किशोर कुलट, बापू औताडे, जालिंदर कुलट, राजू पवार, फारूक शेख, शनी तांबे, अक्षय लगड, दिगंबर कडिले, शिवाजी मोढवे, नवनाथ मोकाटे, रावसाहेब जाधव, सचिन थांडे, ह.भ.प. दिपक महाराज भवर, ह.भ.प. गोवर्धन कमिनसे, ह.भ.प. कार्तिक शिंदे, जिल्हा परिषदेचे सदस्य, बुरूडगावचे माजी सरपंच बापू कुलट, तलाठी आगळे, ग्रामसेवक शेळके, विशाल पवार, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बुरुडगाव, जनजीवन माध्यमिक विद्यालय बुरुडगावचे शालेय शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

बुरुडगाव येथे श्री क्षेत्र पंढरपूरला जाणाऱ्या पायी दिंडीच्या रथाचे पूजन करताना जिल्हाधिकारी यांच्या पत्नी मिनाक्षी सालीमठ. आ. संग्राम जगताप, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, सपोनि श्री. गिते. दुसऱ्या छायाचित्रात फुगडीत दंग झालेल्या महिला.

आ. संग्राम जगताप म्हणाले की, बुरुडगाव पायी दिंडीत वारकऱ्यांना विविध सोयी-सुविधा देऊन एक आदर्श दिंडी म्हणून या दिंडी सोहळ्याने ख्याती प्राप्त केली आहे. वारकऱ्यांचा विमा हा अभिनव उपक्रम इतर दिंडी सोहळ्यासाठी प्रेरणा देणारा असल्याचे स्पष्ट करुन वारीसाठी ग्रामस्थांना शुभेच्छा दिल्या.

जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या पत्नी सौ. मिनाक्षी सालीमठ यांनी वारकऱ्यांना शबनम बॅग दिल्या. यापुढेही आपल्या हातून पांडुरंगाची सेवा घडो असे भावपूर्वक म्हणाल्या. विभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी दिंडीला नगर हद्दीपर्यंत सर्व सुविधा पुरवण्याचे आश्वासन दिले.

पारंपारिक वाद्यांच्या गजरात गावात दिंडीची प्रदक्षिणा मारण्यात आली. जिल्हाधिकारी यांच्या पत्नी सौ. सालीमठ यांनी देखील दिंडीतील महिलांसह फुगड्यांचा फेर धरला होता. दिंडीच्या स्वागतासाठी महिलांनी घरासमोर सडा-रांगोळी टाकली होती. दिंडीच्या अग्रभागी शालेय विद्यार्थी भगवे ध्वज व लेझिम घेऊन सहभागी झाले होते. वारकरी संप्रदायाची पताका खांद्यावर घेऊन ज्ञानोबा माऊली तुकारामचा जयघोष करणारे झेंडेकरी, टाळकरी, भजनी मंडळी, फुलांनी सजवलेले रथ व ढोक्यावर तुळशी, कळस घेतलेल्या महिला दिंडीत सहभागी झाल्या आहेत. दिंडीतील रथाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती.

दिंडीचे हे सातवे वर्ष असून, यावर्षीच्या दिंडीत ५०० गावातील वारकरी मोठ्या भक्तीभावाने सहभागी झाले आहेत. ह.भ.प. लक्ष्मण महाराज शास्त्री, ह.भ.प. योगेश महाराज यांच्या आशीर्वादाने व ह.भ.प. दीपक महाराज भवर यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडी पंढरपूरकडे मार्गस्थ झाली. समस्त ग्रामस्थांनी दिंडी सोहळ्यास स्वइच्छेने वर्णणी व उपयोगी साहित्य देऊन दिंडीला शुभेच्छा दिल्या. दिंडीतील महिलांना साड्या व पुरुषांना कापडी पिशव्यांची भेट देण्यात आली. तर वारकऱ्यांना टाळ देण्यात आले. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते दिंडीच्या माहिती पुस्तिकाचे प्रकाशन करण्यात आले.

राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धा जिंकणे, हे जिल्ह्याचे प्रथम ध्येय

नरेंद्र फिरोदिया यांचे प्रतिपादन

नगर – अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन खेळाशाठी व खेळाडू घडविण्यासाठी दिशादर्शकाची भूमिका पार पाडत आहे. खेळाडूंसाठी सोयी-सुविधा निर्माण करून देण्याचे काम केले जात आहे. राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धा जिंकणे, हे जिल्ह्याचे प्रथम ध्येय असून, त्यापुढे अजून मोठी वाटचाल सुरु राहणार आहे. मुलींमध्ये फुटबॉल खेळाची आवड निर्माण होण्यासाठी विशेष प्रयत्न सुरु असून, महिला खेळाडू पुढे येत आहे. खेळाडूंनी मान्यता नसलेल्या फुटबॉल स्पर्धेत सहभागी होऊ नये, असे आवाहन असोसिएशन अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी केले.

अहमदनगर जिल्हा फुटबॉल असो. पदाधिकारी व कार्यकारी सदस्यांची बैठक हॉटेल आयरीश प्रिमीयर येथे पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षीय भाषणात श्री. फिरोदिया बोलत होते. यावेळी शिरपूर (जि. धुळे) येथे १२ वर्षाखालील आंतर जिल्हा फुटबॉल चॅम्पियनशिप सबज्युनिअर स्पर्धेत उपांत्य फेरी पर्यंत गेलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील मुलांच्या संघातील खेळाडूंचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

याप्रसंगी वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद, मानद सचिव रौनप फनीडीस, सहसचिव प्रदीपकुमार जाधव, सहसचिव व्हिक्टर जोसेफ, सहखजिनदार रणबीरसिंग परमार, कार्यकारी सदस्य पद्मवी रौंदाणे, राजेंद्र पाटोळे, सादिक सय्यद, सॉवियो वेगास, जेव्हिअर स्वामी आदींसह खेळाडू व फुटबाल उपस्थित होते.

पुढे श्री. फिरोदिया म्हणाले की, अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनची स्थापना होऊन ५२ वर्षे झाली. सर्वात जुनी संघटना असलेल्या या असोसिएशनने जिल्ह्यात फुटबॉल जिवंत ठेवण्याचे काम केले. जगातील एक नंबरचा खेळ म्हणून फुटबॉलकडे पाहिले जाते. या खेळाच्या प्रचार-प्रसारासाठी असोसिएशन कार्य करत आहे. शहरातील दोन मुली मुख्य पंच म्हणून पुढे आल्या, हे मोठे यश आहे. फुटबॉलला नवीन उंचीवर घेऊन जाण्याचे कार्य सुरू असून, खेळाडूंना घडविण्यासाठी संघटना सक्षमपणे उभी राहणार असल्याचे सांगितले.

शिरपूर येथील सब्ज्युनिअर स्पर्धेत उपांत्य फेरी पर्यंत गेलेल्या फुटबॉल संघाच्या खेळाडूंचा सत्कार करताना अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया. समवेत इतर पदाधिकारी व खेळाडू.

शिरपूर येथील सबज्युनिअर स्पर्धेत उपांत्य फेरी पर्यंत गेलेल्या नगरच्या खेळाडूंचा सत्कार

या बैठकीत खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी व विविध स्पर्धेत जिल्ह्यातील खेळाडूंनी मिळवलेल्या यशाचा आढावा घेण्यात आला. तर भविष्यात राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेत तील विजेतेपद पटकाविण्याचा संकल्प करण्यात आला. जिल्हा फुटबॉल असोसिएशनने खेळाडूंचा आत्मविश्वास वाढवला. प्रशिक्षण व सरावामुळे खेळाडू पुढे जात आहे. प्रशिक्षकांनी उत्तम प्रकारे मार्गदर्शन केल्याने खेळाडूंमध्ये खेळाचे कौशल्य निर्माण होत आहे. जिल्हाातील फुटबॉल खेळाडूंचे भविष्य उज्वल असून, चांगले खेळाडू घडणार असल्याच्या भावना उपस्थित पालकांनी व्यक्त केल्या.

मुख्य प्रशिक्षक विक्टर जोसेफ व राजू पाटोळे यांनी खेळाडूंसाठी असोसिएशनच्या वतीने स्पर्धे ला जाणे-येण्याची मोफत सोय करुन, स्पर्धेच्या ठिकाणी चांगली व्यवस्था करुन देण्यात आल्याची माहिती दिली. शिरपूर (जि. धुळे) येथे झालेल्या अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघातील खेळाडू भार्गव पिंपळे (कर्णधार), माहिर गुंदेचा (उपकर्णधार), यदुवर कोकरे, इंद्रजित गायकवाड, स्त्वन ठोंबे, विराज दिघे, नमण दिवाणी, जोएल साठे, विरेंद्र वीर, सलिम खान, श्रेयश बोठे, राजवर्धन वीर, अनुज दरेकर, अविनाश वल्लाळ, सियॉन बागुल, आयुष गाडळकर, देवांश झरेकर, पियुश म्हँसमाळ यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

शेवटी सी लायसेन्स कोच जॉय जोनाथन व जेव्हिअर स्वामी व महिला पंच सोनिया दोसानी व प्रियांका आवारे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. पावसाळ्यानंतर अहमदनगर जिल्हा लिग स्पर्धा व त्यानंतर लेक्स फनीडीस कप भरविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. सहशचिव प्रदीपकुमार जाधव यांनी प्रास्ताविक करुन आभार मानले.

अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनची परवानगी नसलेल्या फुटबॉल स्पर्धेत खेळाडूंना सहभागी होता येणार नसल्याचा ठराव या बैठकीत करण्यात आला. परवानगी नसलेल्या फुटबॉल स्पर्धेत खेळाडूंनी सहभाग घेतल्यास त्यांना असोसिएशनच्या मान्यता प्राप्त स्पर्धेत खेळता येणार नसल्याचे जाहीर करण्यात आले. तर वर्ष २०२४-२५ साठी सीआरएस नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आले.

बलसागर जीमच्या युवकांनी पिंतळे होस्टेल परिसरात श्रमदान करुन किरणा दिला. याप्रसंगी बलसागरचे सागर सुरपुरे, युवानचे संदिप कुसळकर, निवृत्त अभियंता सरोदे, श्री.मचे, उपक्रमाचे प्रेरणास्थान मामा सुरपुरे, सीए अभिषेक गुगळे, अभिनव सुडके, अनिकेत गरकल, पार्थ बोथरा आदि.

युवा निर्माणासाठी 'युवान'ला बलसागरचे हात, श्रमदानासह विद्याभोजसाठी मदत

नगर – महिली तंत्रानाच्या युगात युवा पिढी आत्मकेंद्रीत होत असतांना आज 'युवान' या युवकांसाठी कार्य करणाऱ्या संस्थेच्या मदतीसाठी 'बलसागर' जीमच्या युवकांचे हात पुढे आले. 'हाथ लगे निर्माण में... नही मांगेमे.. नही मारो..' या घोषणा देत युवान संस्थेच्या पिंतळे होस्टेल येथे आयोजित कार्यक्रमप्रसंगी दिल्या.

प्रतिकुल परिस्थितीत शिक्षण घेणाऱ्या आपल्या लहान भाऊ-बहिणसाठी बलसागर जीमच्या युवा सदस्यांनी 'विद्या भोजसाठी स्वतःच्या कष्टातून मिळविलेल्या पैशातून किराणा साहित्य दिले. याच बरोबर कुदळ-खोरे हाती घेऊन 'देश की ताकद नौजवान' म्हणत श्रमदान केले. युयकांच्या हाती मोबाईल ऐवजी समाजातील गरजवंतांसाठी पुढे आलेले हात प्रेरणादायी असल्याचे उद्गार युवानचे संस्थापक संदिप कुसळकर यांनी काढले.

यावेळी बलसागर जीमचे संचालक व आंतरराष्ट्रीय रक्षा सागर सुरपुरे यांनी 'युवकांना विधायकतेकडे आणने ही काळाची गरज आहे. आज युवानसाठी पुढे आलेले हात ही गरीब-श्रीमंतीची दरी कमी करुन सुदृढ व बलशाली भारताचे स्वप्न पुर्ण करण्यास प्रेरक ठरेल, असा आशावाद व्यक्त केला.

यावेळी पी.डब्ल्यू.डी.चे निवृत्त अभियंता सरोदे, श्री.मचे, उपक्रमाचे प्रेरणास्थान मामा सुरपुरे, सीए अभिषेक गुगळे, अभिनव सुडके, अनिकेत गरकल, पार्थ बोथरा, स्वस्तिक वराळ, अभिषेक गुगळे, रविंद्र कोंडा, रियाज शेख, आयुष तिपोले, चंगेड, दुस्सा, येरगुंटला व युवान विद्याथ्यांचे सहकार्य लाभले.

ग्राहक पंचायतच्या राष्ट्रीय सहसचिव नेहाताई जोशी यांचा सत्कार

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या राष्ट्रीय सहसचिव नेहाताई जोशी या मथुरा येथे बैठकीला जात असतांना अहिल्यानगर रेल्वे स्टेशन येथे थांबल्या असता, त्यांचा जिल्हा ग्राहक पंचायतीच्यावतीने शहराध्यक्ष सुरेश रुणवाल यांनी स्वागत केले.

दि सेवन्थ स्काय

'मौन दिन' – (१० जुलै २०२४ च्या निमित्ताने)

चिरंजन दैवी प्रियतम अवतार मेहेरबाबा यांच्या अनुसार, विश्व उत्स्फुर्तपणे ईश्वराच्या स्वप्नात साकार झालेले असून ईश्वर आपल्या अनंत देहांच्या द्वारे या स्वप्नमय विश्वात अनंत प्रकारचे अनुवभव घेत आहे. हे स्वप्न ईश्वराने अगोदर ठरवून पाहिलेले नाही. म्हणजेच ईश्वर या स्वप्नमय विश्वाचा निर्माता नाही. ईश्वर या स्वप्नमय विश्वाचा केवळ एक स्त्रोत आहे. म्हणजेच हे स्वप्नमय विश्व सृजन (Creation) नसून प्रकटीकरण (Manifestation) आहे. जर हे स्वप्नमय विश्व प्रकट होण्यामागे ईश्वराचा कोणताही उद्देश नाही, तर मग मनावी जीवन हे ध्येयहीन आहे, असा अर्थ होतो काय?

या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी आहे. प्रियतम बाबांच्या अनुसार, 'आत्मसाक्षात्कार' हे जीवनाचे अंतिम ध्येय आहे. भौतिक सुख हे जीवनाचे अंतीम ध्येय नसून ती जीवनाची केवळ एक गरज आहे. भौतिक सुख हे जर मानवाच्या जीवनाचे ध्येय बनत असेल तर मग ही मानवनिर्मित शोकांतिका आहे. कारण जर भौतिक सुखासाठी मोठी धडपड करावी लागत असेल तर याचा अर्थ असा होतो की, मानवी जीवनात सुख नाही. जर मानवी जीवनात सुखच नाही, तर मग या जगात मानव जन्माला येण्याचे प्रयोजनच काय? असा प्रश्न एखाद्या संवेदना जागृत असणाऱ्या विवेकी मनुष्यास पडणे स्वाभाविकच आहे. केवळ भौतिक सुखाच्या मागे धावत सुटायचे, की केवळ ईश्वर प्राप्तीचा ध्यास घ्यायचा, की कोणावरही अन्याय होणार नाही याची दक्षता घेत संयमी जीवन जगून भौतिक सुख आणि आत्मसाक्षात्कार या दोन्ही गोष्टी मिळतील अशी किमयागिरी करायची, हे तरविण्याचे पूर्ण स्वातंत्र प्रियतम बाबांनी मानवास दिलेले आहे. किंबहुना स्वातंत्र हेच प्रियतम बाबांच्या तत्वज्ञानाचे वैशिष्ट्य व ध्येय दोन्ही आहे. या बाबतीत प्रियतम बाबा उदारमतवादी आहेत. प्रियतम बाबांनी आत्मसाक्षात्कार होण्यासाठी सांगितलेला मार्ग म्हणजे ईश्वर प्रेम, ध्यान व

देखील राक्षस बनेल. पुराणांत तर अशी अनेक उदाहरणे सापडतात.

मानवाचे मन संशयी असल्याने ईश्वराच्या एका विशिष्ट साकार रुपावर स्थित राहत नाही. त्यामुळे असा संशयी साधक आपल्या आयुष्यात डहनभर देवता बदलतो. म्हणूनच ईश्वराच्या निराकार स्वरुपाचे ध्यान करणे साधकाच्या हिताचे आहे.

पवित्र जीवन म्हणजे आत्मसाक्षात्कार हे जीवनाचे सर्वोच्च ध्येय मानून कोणावरही अन्याय होणार नाही याची दक्षता घेत सयमीपणे व अहिंसकपणे जीवन जगणे होय.

आता पवित्र जीवनात कोणत्या प्रकारच्या जीवनाचा समावेश होतो व कोणत्या प्रकारच्या जीवनाचा समावेश होत नाही याबद्दल मी मौन बाळगणे पसंद करतो. कारण न्याय सांगून अन्याय करणे हीच आता जगाची रीत झालेली आहे. जंगल हा जगाचा भूतकाळ आहे व वाळवंट हा जगाचा भविष्यकाळ आहे, कारण सर्वस्तरीय शोषण हा जगाचा वर्तमानकाळ आहे. परिस्थिती इतकी गंभीर असताना पवित्र जीवनाबद्दल अपव्या पसरवून समाजात पवित्र जीवनाबद्दल गैरसमज, द्वेष व भीती पसरवणे हे सुसंस्कृतपणाचे लक्षण आहे काय? याबद्दल समाजाने अतिशय गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे. सर्वांना 'मौन दिन'च्या निमित्ताने हार्दिक शुभेच्छा! जय बाबा!

– **ऋषीकेश नोडसे.** अ.नगर, संदर्भ – 'मेहेर प्रभू'

कॉपीराईटस् – अवतार मेहेरबाबा प. प. चॅ. ट्रस्ट, अ.नगर

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका त्वरित घ्या

जालिंदर कदम

नगर – महाराष्ट्र राज्यामध्ये पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद, नगरपालिका महानगरपालिकांचा कार्यकाल संपूर्ण तब्बल दोन ते तीन वर्ष पूर्ण झालेले आहे, तरीपण राज्याचे सरकार व निवडणूक आयोग या संस्थांच्या निवडणुकीमध्ये कोणत्याही प्रकारची हालचाल न करता फक्त बघत आहे. पण सदर निवडणुका न घेतल्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी गोरगरीब जनतेमध्ये मोठे नैराश्य निर्माण झालेले आहे त्यामुळे त्या त्वरित घाव्यात अशी मागणी आदर्श गाव मांजरसुंभाचे माजी सरपंच जालिंदर कदम यांनी केली आहे

पंचायत समिती जिल्हा परिषद मार्फत ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्यांच्या वाड्यावस्तीवर जाणारे छोटे छोटे रस्ते, त्या रस्त्यांना मुरूम टाकणे, पथदिवे लावणे, सोलर दिवे लावणे, कुट्टी मशीन, शिलाई मशीन, मुलांच्या सायकली अशा अनेक प्रकारच्या कामाला खिळ बसलेली आहे. सामान्य माणूस हा मोठ्या प्रतिनिधी पर्यंत पोहोचू शकत नाही. या शासनाने निवडणूक सुरू झालेली बंद केली. परत त्या निवडणुकीकडे फिरकून पाहिले नाही.

त्यानंतर लोकसभा, नंतर विधानपरिषद या सर्व निवडणूका महाराष्ट्र शासन, आयोग सर्व नेते मंडळी पूर्ण करीत आहेत. पण जनसामान्यातला कार्यकर्ता हा पंचायत समिती, जिल्हा परिषद या स्तरावर जाण्यापासून अनेक दिवसापासून वंचित राहिलेला आहे. त्याची त्यांनी वाट किती दिवस वाट पाहायला पाहिजे हा गोष्टीचा अंत राहिलेला नाही. या सर्व छोट्या–मोठ्या पदाधिकाऱ्यांना विधानसभा लढवण्याची सुद्धा तयारी ठेवावी लागण्याची वेळ आलेली आहे. कारण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका शासनामार्फत घेतल्या जातील किंवा नाही. याची कोणालाही खात्री नाही. याची दखल कोणी पण घेत नाही, त्या सर्व गोष्टीची दखल घेतली पाहिजे,

रस्ते, लाईट, वीज अशा अनेक प्रश्नाला शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागते सामान्य माणूस पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, पदाधिकारी यांच्याकडून या संस्थेमार्फत अनेक प्रकारची कामे मिनी आमदारकी समजून पूर्ण होत होते. पण याच संस्थेच्या चालू असणाऱ्या निवडणुका रद्द करून परत घेण्याचे नावच घेतलेले नाही, तरी सरकारने या गोष्टीचा बारकाईने विचार करावा आपल्या आमदारकीप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकी घेतल्या पाहिजे. जनसामान्यांमध्ये हुकूमशाही निर्माण झाली की काय असे चित्र या महाराष्ट्रामध्ये तयार झालेले आहे.

स्थानिक संस्था ग्रामीण भागाचा विकासाचा कणा आहे आणि या दोन्हीही संस्थेची निवडणूक न घेतल्याने ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य यांना मोठ्या अडचणीला तोंड द्यावा लागत आहे. ग्रामसेवकाला वेळ नाही. ते चार चार गावांना जोडलेले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार काम करावे लागते. जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य असल्या मुळे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांना गावातील सर्व ग्रामस्थांना संपर्क करून काम करता येत होतं, ही सिस्टीमच पूर्ण बंद असल्यामुळे गावाचे मोठे नुकसान झालेले आहे. अधिकारी काम करत नाही, इंजिनिअर गावात येत नाहीत, ग्रामसेवक वेळेवर गावात येत नाही अनेक अडचणीला सामोरे जावे लागते. निवडून आलेले पदाधिकारी, ग्रामस्थ त्रस्त झालेले आहेत.

ऊर्जा क्षेत्रातीक गुंतवणुकीच्या संधी

कलीमुल्लाहुसैन बी. शेख

भारताच्या ऊर्जेचा वापर गेल्या दोन दशकांत दुपटीने वाढला असून, तो जागतिक स्तरावर चौथ्या क्रमांकाच्या ग्राहक बनला आहे. मात्र भारताच्या दरडोई ऊर्जा वापर जागतिक सरासरीच्या केवळ एक तृतीयांश आहे, त्यामुळे लक्षणीय प्रमाणात न वापरलेली शक्यता निर्माण आहे. या शक्यतांमुळे या क्षेत्रात विकास आणि गुंतवणुकीच्या असलेल्या मुबलक संधी अधोरेखित होतात.

भारताची विकसनशील ऊर्जा क्षेत्र

पुढील काही दशकांत जसजसा भारताचा विकास होत जाईल, तसतशी त्याची वीज आणि इंधनाची गरज तीव्र होत जाईल. देशाचा जीडीपी विकास आणि ऊर्जा क्षेत्राचा विस्तार यांमध्ये जवळचा संबंध आहे. शाश्वत आर्थिक विकासासाठी, औद्योगिकीकरणाला वाढवा देण्यासाठी आणि जीवनमान उंचावण्यासाठी ऊर्जा क्षेत्र मजबूत असणे महत्त्वाचे आहे.

सन २०७० पर्यंत 'नेट झिरो' उत्सर्जन साध्य करण्याची भारताची महत्त्वाकांक्षा आहे. त्यामुळे अक्षय ऊर्जेला पाठिंबा मिळाली आहे आणि सौर व पवन ऊर्जा क्षमता अधिकाधिक आहेत. सन २०७० पर्यंत 'नेट झिरो'चे भारताचे उद्दिष्ट साध्यासाठी नवीकरणीय ऊर्जेवर मोठ्या प्रमाणात भर द्यावा लागेल. त्यामुळे ऊर्जा पुरवठा साखळीतील विद्यमान आणि नवीन कंपन्यांसाठी संधी खुली होण्याची शक्यता आहे.

सरकारी सुधारणा

भारताच्या ऊर्जा क्षेत्राचा कारभार–पालट करण्यात सरकारी सुधारत्यांचा महत्त्वाचा वाटा आहे आणि असेल. देशांतर्गत तेल आणि वायू उत्पादनासाठी स्वहस्तक्षेप धोरणे, गॅसच्या किंमतीत सुधारणा, वाहन इंधन सबसिडी काढून टाकणे, उत्तम मॉडेलची वाटप, गॅस वाण्यासाठी एकत्रित दर लागू करणे आणि वीज परिषदेत इक्वाल्टझेन, एलएनजी टर्मिनल आणि शहरी गॅस वितरण नेटवर्कमध्ये भरीव गुंतवणूक यांचा या पायलीमध्ये समावेश आहे.

बाजारपेठेत भांडवल आणि प्रॉक्सिट फूल

ऊर्जा संक्रमणपोर्टफोलिओ बाजार भांडवलाची उपलब्धता ३१ मे २०२४ पर्यंत सध्या ८ टक्क्यांवर असून ते व्यापक बाजार निर्देशांकांमध्ये ९१ टक्क्यांच्या प्रॉक्सिट फूल प्रतिनिधित्वाच्या तुलनेत लक्षणीय आहे. आपल्या वाढत्या नफ्याच्या अनुषंगाने बाजारपेठेतील आपला हिस्सा वाढविण्याची आहाजाच्या क्षमतेचा यातून दिसून येते.

निष्कर्ष

वाढत्या गतीशील पूर्तता कंपन्यासाठी आणि भारताच्या महत्त्वाकांक्षी विकासाच्या मार्गाला आधार देण्यासाठी अक्षय ऊर्जा स्त्रोतांमधील गुंतवणूक, ऊर्जाकार्यक्षम तंत्रज्ञानातील प्रगती आणि ऊर्जा पायाभूत सुविधांमध्ये वाढ हे महत्त्वपूर्ण तरतील तात्पर्य, भारताच्या आर्थिक विस्तारातून नफा मिळवू इच्छिणाऱ्या गुंतवणूकदारांना ऊर्जा क्षेत्रा महत्वपूर्ण संधी उपलब्ध आहेत.

अक्षय इन्वेस्टमेंट्स चे कलीमुल्लाहुसैन बी. शेख म्हणाले की ऊर्जा क्षेत्रात रस असलेल्या मूलवधूकदारांसाठी आयडीअसलीकरन ब्लूप्रिंटमध्ये म्युच्युअल फंडाकडे ऊर्जा क्षेत्रावर लक्ष केंद्रीत करणारी नवीन फंड ऑफर (एनएफओ) असून ती १६ जुलै २०२४ पर्यंत खुली आहे. या योजनेच्या गुंतवणुकीच्या परीघात इंधन ऊर्जा, तेल आणि वायू क्षेत्र, ऊर्जा आणि संबंधित क्षेत्रातील कंपन्यांचा समावेश आहे.

रोटरीच्या प्रियदर्शनी ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीकडून तांदळी वडगाव येथील माळवाडीत असलेल्या जि.प. शाळेस साऊंड सिस्टिम भेट देण्यात आले.

रोटरीच्या प्रियदर्शनी क्लबकडून माळवाडी शाळेस अनोखी भेट

नगर – रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीकडून तांदळी वडगाव येथील माळवाडीत असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला अनोखी भेट देण्याचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. खाजगी प्राथमिक शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष रघुनाथ टोंबरे यांच्या विशेष प्रयत्नामधून या कार्यक्रमाचे उत्तम नियोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आणि सर्वांगीण प्रगतीसाठी, ग्रामीण भागामधील विद्यार्थ्यांच्या कला, क्रीडा व सांस्कृतिक गुणांना वाव मिळण्यासाठी लसेच दैनंदिन प्रार्थना शारिरीक कवायत, विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि १५ ऑगस्ट, २६ जानेवारी हे राष्ट्रीय सण साजरे करण्यासाठी दर्जेदार उत्तम प्रतीच्या साऊंड सिस्टीमची भेट रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीकडून तांदळी वडगाव येथील माळवाडीत असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला देण्यात आली. शिवाय या शाळेतील स्वयंपाकगृहास मजबूत फरशी बसवून देण्यात आली.

याप्रसंगी मुख्याध्यापक गणेश कुलांगे, उपशिक्षक जयवंत भापकर, माजी सरपंच बाळासाहेब टोंबरे, मेसु उबाळे, माजी सैनिक भास्कर कराळे, माजी सैनिक रमेश दळवी, दूध डेअरीचे चेअरमन संतोष पिगे आणि विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीच्या अध्यक्षा सौ.देविका रेळे, आशा फिरोदिया, प्रतिभा घूत, ज्योती गांधी, शुभा बोगावत, आर्किटेक्ट मिनल काळे, विमा तांबडे, सविता काळे, निना मोरे, वैशाली कोलते या भगिनी आणण दिलेल्या भेटीमुळे आनंदीत झालेले विद्यार्थ्यांचे चेहरे पाहून समाधान अनुभवत राहिल्या. रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीच्या या अनोख्या भेटीमुळे बालचमूंसह शिक्षकवृंद आणि उपस्थित ग्रामस्थ भारावून गेले.

रोटरी परिवाराच्या सामाजिक कार्यामुळे अनेकांच्या जीवनात नवी पहाट

लेफ्टनंट कर्नल सोमेश्वर गायकवाड यांचे प्रतिपादन; रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या पदग्रहण सोहळ्याप्रसंगी लेफ्टनंट कर्नल सोमेश्वर गायकवाड. समवेत नूतन अध्यक्ष डॉ. कुणाल कोल्हे, सुनिल कटारिया व इतर पदाधिकारी.

नगर – जगभरात सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेला रोटरी परिवार आदर्शवत काम करत असतो. नगरमध्ये रोटरी सेंट्रलच्या विविध उपक्रमामुळे अनेकांच्या जीवनात नवी पहाट उगवली आहे. शिक्षण, आरोग्य या क्षेत्रात रोटरी सारख्या संस्थांनी पुढाकार घेतल्याने सकारात्मक बदल घडत आहेत. सैन्य दराप्रमाणेच शिस्तबद्ध आणि आपुलकीने सेवा रोटरीचे वैशिष्ट्ये आहे असे प्रतिपादन लेफ्टनंट कर्नल सोमेश्वर गायकवाड यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून लेफ्टनंट कर्नल गायकवाड बोलत होते. रोटरी सेंट्रलचे नूतन अध्यक्ष डॉ. कुणाल कोल्हे, सेक्रेटरी सुनिल कटारिया यांच्यासह नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी या कार्यक्रमात पदभार स्विकारला.

याप्रसंगी लेफ्टनंट कर्नल डॉ. नांगरे, रोटरीचे पीडीजी शिरिष रायते, असिस्टंट गव्हर्नर किरण कारला, मावळते अध्यक्ष हरिष नय्यर, फर्स्ट लेडी किर्ती कोल्हे, डॉ. प्रिती नय्यर, डॉ .एस. व्ही. जोशी, ईश्वर बोरा आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात नवीन ८ सदस्यांचे रोटरी परिवारात स्वागत करण्यात आले.

हरिष नय्यर यांनी मागील वर्षभरातील कामांचा आढावा सादर करताना सांगितले की, रोटरी परिवार तनमनधनाने समाजासाठी कार्य करीत आहे. गतवर्षी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात यश आले. सर्व रोटरियन्सनी यासाठी मोलाचे सहकार्य केले. नगर शहरात भव्य रोटरी शॉपिंग फेस्टिवल घेण्यात आला. याशिवाय शहरात प्रथमच जवळपास सर्व हॉस्पिटलमधील पश्चिरिकांचा आनंद मेळावा घेऊन त्यांचा सन्मान केला. रोटरी सेंट्रलच्या पहिल्या ग्लोबल ग्रँट अंतर्गत नवजात शिशू न्यूरोब्रिटिकल केअर मशीन व प्रशिक्षण या महत्वाकांक्षी प्रकल्पाचा लोकार्पण सोहळाही यात पडला.

नूतन अध्यक्ष डॉ. कुणाल कोल्हे म्हणाले, आगामी वर्षात रोटरी सेंट्रल नियोजनपूर्वक सामाजिक कार्याची परंपरा कायम राखणार आहे. शासनाच्या पर्यावरण जागृती, पोलिओ निर्मूलन, आरोग्य, कृषीविषयक विविध उपक्रमात रोटरियन्स सक्रिय सहभाग घेऊन आपले योगदान देतील. नवीन सभासद रोटरी परिवारात सहभागी करून घेण्यासाठी विशेष पुढाकार घेण्यात येईल. एकीचे बळ आणि समाजासाठी काम करण्याची तळमळ असल्याने रोटरी सेंट्रल आगामी काळात आपल्या कार्याचा आणखी विस्तार करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करेल अशी ग्वाही त्यांनी दिली.

या कार्यक्रमास उपाध्यक्ष गोविंद कनोजिया, प्रसन्न खाजगीवाले, चेतन अमरापूरकर, हितेश गुप्ता, मनिष बोरा, संतिश कटारिया, डॉ. दिलीप बागल, गिरीश मुळे, आदित्य गांधी, निखिल कटारिया, निवृत्ती झिने, श्रेया खाजगीवाले, अतुल बोरा, सुजाता कटारिया, अभिजित कोठारी, चंद्रकांत मेहत्रे आदी सभासद उपस्थित होते.

सूत्रसंचालन ईश्वर बोरा यांनी केले तर आभार नूतन सेक्रेटरी सुनिल कटारिया यांनी मानले.

राष्ट्रीय चर्मकार महासंघ विधानसभेला ५० जागा लढविणार

राष्ट्रीय, राज्यस्तरीय कार्यकर्ता संमेलनात मोठी घोषणा

बबनराव घोलप

नगर – चर्मकार समाजाचे १३–१४ आमदार असून देखील चर्मकार समाजाच्या वाट्याला उपेक्षाच येत असते असे सातत्याने पाहण्यात येते. परंतु इथून पुढील काळात असे होऊ द्यायचे नाही. राष्ट्रीय चर्मकार महासंघ आतापर्यंत अराजकीय संघटना म्हणून कार्यरत होती, यापुढे राजकीय क्षेत्रात आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने संघटनेच्या वतीने महाराष्ट्रात ५० जागा लढवणार, अशी घोषणा राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप यांनी केली.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्यावतीने नवनिर्वाचित खासदारांचा सत्कार तसेच राज्य पदाधिकारी कार्यकर्ता संमेलनाप्रसंगी ते बोलत होते. पुण्यातील भोसरी येथील कै.अंकुशराव नाटप्गृह येथे नुकत्याच झालेल्या या संमेलनात संपूर्ण महाराष्ट्रातून राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय, राज्य तसेच जिल्हाचूत असंख्य असे पदाधिकारी उपस्थित होते.

चर्मकार समाजाच्या प्रक्षासाठी उन्नती आणि विकासासाठी कोणत्याच आमदारालला महत्व दिले जात नाही. जर आमदारांची संख्या जास्त असेल तर विकास समाजाचा विचार करावाच लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे राज्यकर्ती, शासनकर्ती जमात व्हा, जेव्हा असे होईल तेव्हाच समाजाला न्याय मिळेल आणि आता राज्यकर्ते शासनकर्ते होण्याची वेळ आलेली आहे. जेव्हा बहुसंख्येने चर्मकार समाजातील आमदार प्रश्न उपस्थित करतील तेव्हा सरकारला त्याची दखल घ्यावीच लागेल. एखादा समाज तेव्हाच प्रगत होतो, जेव्हा त्याच्या विकास आणि उन्नतीसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या योजना शासन अंमलात आणते आणि त्यातील सर्व राष्ट्रीयता चर्मकार समाजाच्या आमदारांची संख्या जेव्हा एखादा मुख्यमंत्री निवडण्यास निर्णायक ठरेल तेव्हा चर्मकार समाजाचा सगळेजण विचार करतील आणि समाजाचा हित साधले जाईल, असे घोलप म्हणाले.

ओपन जागेवरून जेव्हा चर्मकार समाजाचा उमेदवार आमदार होऊ शकतो तर राखीव जागेवरून का नाही, चर्मकार समाज सगळ्यात मिळून मिसळून वागणारा समाज असल्याने इतर समाज देखील चर्मकार समाजाकडे आशेने, सहानुभूतीने पाहत असतो. त्यामुळे या विधानसभेला राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने ५० जागा लढवणार आणि तेव्हाच मुख्यमंत्री निवडताना चर्मकार समाजाचा विचार निश्चित होईल. असे परखड मत त्यांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय सचिव ज्ञानेश्वर कांबळे व प्रा. शशिकांत सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी शाखेच्यावतीने आयोजित कार्यक्रमप्रसंगी राष्ट्रीय राज्य पदाधिकारीसह भानुदास विसावे, सरोजताई बिसूरे, माधवराव गायकवाड, शांताराम कारंडे, अनिल कानडे, राजेंद्र बुंदेले, शोभाताई कानडे, लताताई नेटके, रघुनाथ आंबेडकर, भाऊसाहेब पवार, सुखदेव केदार, प्रतिभाताई धस, गणेश गोरे, पोपट शेटे आदींसह कार्यकर्त्यांची बहुसंख्येने उपस्थित होते.

प्रकाश नेत्रालयातील मोफत शिबीरा अंतर्गत तपासणी करीता आलेले रुग्ण तेसच डॉ. राजीव चिटगोपेकर आणि रोटरी इंटिग्रीटी क्लबचे माजी अध्यक्ष रफिक मुन्शी आदी दिसत आहे.

प्रकाश नेत्रालय आणि 'रोटरी इंटिग्रीटी'तर्फे मोफत नेत्र तपासणी

नगर – रोटरी इंटिग्रीटी क्लब अहमदनगर आणि प्रकाश नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमानाने मोफत नेत्र तपासणीचे शिबीर घेण्यात आले. कै. डॉ. प्रकाश चिटगोपकर यांच्या स्मरणार्थ या शिबीराचे आयोजन प्रत्येक वर्षी स्मृतीदिनास केले जाते. या शिबीरामध्ये रुग्णाची मोफत तपासणी केली जाते. शिबीरामध्ये ८० रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे. आजपर्यंत प्रकाश नेत्रालयामध्ये १५,००० डोळ्यांच्या शस्त्रक्रिया केल्या असल्याचे प्रकाश नेत्रलयाचे डॉ. राजीव चिटगोपेकर यांनी सांगितले.

कै. डॉ. प्रकाश चिटगोपकर यांचे बाबत माहिती देत असतांना रफिक मुन्शी यांनी सांगितले की, साधारणतः सन १९९८ पूर्वी यांचा छोटासा दवाखाना माणिक चौकामध्ये होता. परंतु दुर्दैवाने अपघातात त्यांचे निधन झाले त्यावेळी डॉ. राजिव हे प्राथमिक शाळेत शिकत होते. परंतु आईने त्यांचे योग्य ते शिक्षण पूर्ण करुन आपल्या वडीलांची म्हणजे डॉ. प्रकाश यांचे नेत्रालय तज्ञ होण्याचे मुलाचे स्वप्न पूर्ण केले. डॉ. प्रकाश यांच्या मानवतेच्या दृष्टिकोनातूनच डॉ. राजीव चिटगोपकर यांनी प्रकाश नेत्रालय आधूनिक उपकरणासह सुरु केले.

विशेषतः या मध्ये त्यांनी दारिद्र्य रेषेखालील गरीब, अनाथ, परित्यक्ता महिला या रुग्णाचे मोफत शस्त्रक्रिया केल्या हे येथे विशेष महत्वाचे आहे असे सांगितले. या पूर्वी डॉ. चिटगोपकर यांनी अरुणाचव येथील मानव कल्याण या निराधार मतिमंद लोकांची मागील वर्षी स्मृती दिनानिमित्त मोफत तपासणी करुन सर्व आश्रमातील लोकांना मोफत चश्मे वाटले असे रोटरी क्लबचे सचिव निखील कुलकर्णी यांनी सांगितले. या शिबीरास माजी अध्यक्ष प्रा. चंदना शाह आणि पुजा पटनाईक यांनी सहकार्य केले.

राष्ट्रीय, राज्य, जिल्हा शिक्षक पुरस्कारांसाठी ऑनलाईन कार्यशाळा सुलभ–२०२४ चे आयोजन

नगर – भारत सरकारच्या शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग, तसेच उच्च शिक्षण विभाग मंत्रालयाच्या वतीने विविध राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार व राष्ट्रीय तांत्रिक शिक्षक पुरस्कार त्याचबरोबर शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२३–२४ देण्यात येणार आहेत. या निमित्ताने शिक्षकांना पुरस्कार निवड प्रक्रिया सुलभतेने माहीत व्हावी व त्यांच्या शंकांचे निरसन व्हावे म्हणून शिक्षक डॉ.अमोल बागुल यांनी ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळा सुलभ–२०२४ चे आयोजन केले आहे.

१० जुलै रोजी सायं.७ वाजता फेसबुक लाईव्ह माध्यमातून ही कार्यशाळा होणार असून यामध्ये ऑनलाईन अर्ज नोंदणी, मुलाखतीची पूर्वतयारी, कागदपत्रांची माहिती, कार्याची विभागणी–मांडणी व प्रस्तुती व उपक्रमांचे नाविन्य आदी विविध गोष्टींबाबत माहितीपूर्ण मार्गदर्शन केले जाणार आहे.

२०२४ सालापासून शिक्षण मंत्रालयाच्या वतीने पहिल्यांदाच राष्ट्रीय तांत्रिक शिक्षक पुरस्काराचे आयोजन सुरू झाले असे याबद्दल देखील अधिक माहिती अमोल बागुल या फेसबुक पेजवरील लाईव्ह वेबिनार मध्ये प्रस्तुत केली जाणार आहे.

शिक्षक, शिक्षणप्रेमी यांनी या वेबिनार मध्ये सहभागी व्हावे व आपल्या शंकांचे निरसन करुन घ्यावे अपल्या काही शंका असल्यास ९५ ९५ ५४ ५५ ५५ या व्हाट्सअप क्रमांकावर पाठवायाल असे आवाहन करण्यात आले आहे.

दि अंबिका महिला सहकारी बँक लि., अहमदनगर.

मुख्य कार्यालय – ४३९८, पंचपीर चावडी, माळीवाडा, अहमदनगर. फोन – (०२४१) २३५९८५५

"दरपत्रक मागणी"

बँकेच्या खालील कामकाजासाठी अधिकृत एजन्सीज, पुरवठादार, प्रिंटींग प्रेस यांच्याकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

अ.नं	कामाचे नांव
१	बेंटऱ्या खरेदी करणे.
२	वार्षिक अहवाल व दैनंदिन कामकाजासाठी लागणारे वार्षिक छपाईचे कामकाज करणे.

यासंबंधीच्या अटी व शर्ती व कोरे दरपत्रक बँकेच्या मुख्य कार्यालयातून विना परतीचे रू. १०० रोख भरणा करून घ्यावेत. माहितीने पूर्ण भरलेले दरपत्रक बँकेच्या मुख्य कार्यालयात जमा करण्याची अंतिम मुदत दि. १५.०७.२०२४ दुपारी ३.०० वाजेपर्यंत राहील.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अंकुश नायकवाड | **उपाध्यक्ष सौ. शोभा स्वरपुडे** | **अध्यक्ष सौ. भारती आठरे**

मलेशिया येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या एशिया रिट्रीट सेंटर ला बी के डॉ दीपक हरळे यांनी भेट दिली असता एशिया रिट्रीट सेंटर च्या संचालिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी नीरी दीदी यांनी त्यांचे स्वागत केले.

राष्ट्रीय अटल फाउंडेशनच्या महाराष्ट्र प्रदेश महामंत्रीपदी मिलिंद भालसिंग यांची फेरनिवड

नगर – भारतीय जनता पार्टी मध्ये केलेल्या कामाची तसेच राष्ट्रीय अटल फाउंडेशनच्या माध्यमातून आतापर्यंत महाराष्ट्र प्रदेश मंत्री, महाराष्ट्र प्रदेश महामंत्री या पदावर काम केलेल्या उत्तम कार्याबद्दल या कामाची दखल घेऊन लिस्त्यांदा राष्ट्रीय अटल फाउंडेशनच्या राष्ट्रीय अध्यक्ष श्रीमती अपर्णा सिंह, राष्ट्रीय उपाध्यक्ष अमोल कुलथिया, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश राजे यांनी महाराष्ट्र प्रदेश महामंत्री मिलिंद भालसिंग यांची फेरनिवड करण्यात आली आहे.

आशा फाऊंडेशनतर्फे तलवारबाजीच्या खेळाडूंचा सत्कार

नगर – नाशिक येथे नुकतेच पार पडलेल्या राज्यस्तरीय तलवारबाजीमध्ये नगरच्या १४ वर्षाखालील व १० वर्षाखालील खेळाडूंनी सिल्व्हर व ब्रॉझ मेडल मिळवून विशेष प्राविण्य प्राप्त केले तसेच खेळाडूंची राष्ट्रीय तलवारबाजीसाठी निवड झाली.

राष्ट्रीय स्पर्धा ही ओडीसा कटक येथे खालील खेळाडूंची निवड झाली व राष्ट्रीय स्पर्धेत सुद्धा खेळाडूंनी उत्तम कामगिरी केली. निवड झालेले खेळाडू पुढील प्रमाणे – रिद्धी महाडिक, गार्गी देशमुख, निधी देशमुख, प्रांजल बडगू, प्रज्वल सत्रे, वषुधा साठे, आर्यन सत्रे, अबद दौड. या खेळाडूंना सुनील गोडळकर यांनी मार्गदर्शन केले व ओंकार सुरा व वैष्णवी गोडळकर यांनी वेळोवेळी सराव घेवून मार्गदर्शन केले.

या खेळाडूंचा आशा फाऊंडेशनतर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी डि. एस.ओ. ऑफीसचे श्री. खुरांगे प्रमुख पाहुणे म्हणून म्हणून उपस्थित होते व त्यांच्या हस्ते या खेळाडूंचा गौरवण्यात आले तसेच श्री. गोडळकर सर, वैष्णवी गोडळकर व ओंकार सुरा यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी इतक्या लहान वयात खेळाडूंची प्रगती पाहून श्री. खुरांगे यांनी आनंद व्यक्त केला

राज्यस्तरीय तलवारबाजीमध्ये सिल्व्हर व ब्रॉझ मेडल मिळवून विशेष प्राविण्य प्राप्त करणाऱ्या खेळाडूंचा आशा फाऊंडेशनतर्फे सत्कार करण्यात आला.

...म्हणून जीव वाचला

ज्ञान असणे आणि नेमक्या वेळी आपल्या ज्ञानाचा दुसऱ्यास उपयोग होईल अशी कृती करणे यात मोठे अंतर बघायला मिळते. मात्र मेजर डॉ. सिमरत राजदीप सिंग यांनी हवाई प्रवासातील आपल्या सहप्रवासी असणाऱ्या युवकाची स्थिती पाहिली आणि त्वावर तातडीने उपचार करुन जीवदान दिले. विमानातील सर्व प्रवाशांनी त्यांच्या या कृतीचे कौतुक केले. कसा होता इंडिगो विमानातील हा थरार... जाणून घेऊ या...

अचिव्हर

अलिकडेच इंडिगोच्या पुणे-चंदीगड विमानात एका प्रवाशाची तब्येत अचानक बिघडल्याने एकच गोंधळ उडाला. अशा परिस्थितीत जीवनदूत बनून पुढे आलेल्या एका लष्कराच्या डॉक्टरने पुणे-चंदीगड विमानात बसलेल्या आणि गंभीर अवस्थेतील या २७ वर्षीय तरुणाला शुद्धीवर आणून त्याचे प्राण वाचवले. आजारी व्यक्तीला तातडीची औषधे देण्याबरोबरच विमानाचे मुंबईत इमर्जन्सी लॅंडिंग करण्याची विनंतीही त्यांनी केली. त्यांनी दाखवलेल्या या तत्परतेमुळे आणि अचूक उपचारामुळे संबंधित तरुणाला नवे जीवन मिळाले असेच म्हणावे लागेल. अनेकांकडे ज्ञान असते, शिक्षण असते. मात्र आपल्या शिक्षणाचा, ज्ञानाचा कसोटीच्या वेळी कसा उपयोग करुन घ्यायचा याचे भान काहीजणांकडेच असते. अर्थातच त्यासाठी उत्तम निर्णयक्षमता, धडाडीने पुढे जाण्याचा आणि आधार देण्याचा स्वभाव असणे गरजेचे असते. हे सगळे गुण असल्यामुळेच लष्कराच्या वेस्टर्न कमांड हॉस्पिटल, चंडीमंदिर (हरियाणा) चे वैद्यकीय अधिकारी मेजर सिमरत राजदीप सिंग सध्या चर्चेतील नाव आहे.

झाले असे की, इंडिगोच्या विमान ३९,००० फूट उंचीवर असताना शेजारील तापाने फळलेला एक सहप्रवासी अत्यवस्थ होत असल्याचे त्यांना समजले. त्याची तब्येत इतकी बिघडली होती की, श्वास घेण्यासही त्रास होत होता. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत मेजर सिमरत यांनी रुग्णाबरोबर प्रवास करणाऱ्या त्याच्या भावाला वैद्यकीय इतिहास विचारला. सांगितल्या गेलेल्या वैद्यकीय स्थितीनुसार रुग्णाची किडनी लहान असून ती नीट काम करत नसल्याचे समोर आले.

याचबरोबर रुग्णाला उच्च रक्तदाब आणि हृदयविकाराचा त्रासही होता. तो वेगाने श्वास घेत होता आणि तो हळू धापा टाकू लागला होता. क्रूकडे त्यांच्या वैद्यकीय आणीबाणीच्या किटमध्ये बहुतेक आवश्यक उपकरणे आणि औषधे उपलब्ध होती. त्याच्या आधारे सिंग त्यांनी रुग्णाला आवश्यक तातडीची औषधे दिली आणि तासभर सतत ऑक्सिजन सपोर्टवर ठेवले. दुसरीकडे त्यांनी फ्लाइट कॅप्टनला विमानाची उंची कमी करुन जवळच्या ठिकाणी इमर्जन्सी लॅंडिंग करण्याची विनंती केली, कारण विमानप्रवास संपणारे चंदीगड विमानतळ दोन तासांवर आहे.

त्यानुसार मुंबई विमानतळावर विमानाचे इमर्जन्सी लॅंडिंग करावे लागले. दरम्यान, विमान उतरताच रुग्णाला रुग्णालयात नेण्याची तयारी करण्यात आली. त्याला बृहन्मुंबई महानगरपालिका संचालित आरएन कूपर रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्वरित उपचार मिळाल्यामुळेच त्याचे प्राण वाचले. गोय्याहून चंदीगडला जाणाऱ्या इंडिगो फ्लाइट ए ७२४ मधील प्रवाशांनी अगदी जवळून हा सगळा प्रकार पाहिला आणि २७ वर्षीय गंभीर आजारी रुग्णाचे प्राण वाचवल्याबद्दल डॉक्टर सिंह यांचे आभार मानले. रुग्णालयात दाखल करताच आजारी व्यक्तीचे तातडीने डायलिसिस झाले. अन्य आवश्यक उपचारही वेळेत मिळाल्यामुळे आता तो धोक्याबाहेर आहे.

ब्रेडचे अतिसेवन नको

फिटनेस फंडा

प्रत्येकाला ब्रेड खायला आवडते. सध्या वेगवेगळ्या प्रकारे ब्रेडचे सेवन केले जाते. यापासून अनेक चविष्ट पदार्थ तयार केले जातात. पण तुम्हाला माहित आहे का की, ब्रेडच्या सेवनाने आरोग्याचे मोठे नुकसान होते. ब्रेडमध्ये प्रथिने किंवा जीवनसत्त्वे नसतात. उलट ब्रेडच्या सेवनामुळे शरीराची पचनसंस्था कमकुवत होते आणि आपल्याला आरोग्याशी संबंधित अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळेच ब्रेड खाण्याचे तोटे जाणून घेणे गरजेचे आहे.

ब्रेडमध्ये भरपूर सोडियम सोडियम असते. अर्थातच सोडियमची इतकी उच्च मात्रा शरीरासाठी हानिकारक असते. यामुळे रक्तदाब आणि हृदयविकार होऊ शकतो. ब्रेडचे वारंवार सेवन केल्याने शरीरात भरपूर प्रमाणात मीठ जमा होते. त्यामुळेही हृदयविकाराच्या झटक्याशी संबंधित समस्या वाढू शकतात.

आजच्या तरुण पिढीला ब्रेडपासून बनवलेल्या सगळ्याच गोष्टी खूप आवडतात. पण हीच बाब लठ्ठपणाचे कारणही बनताना दिसते. ब्रेडमध्ये भरपूर कॅलरीज असल्यामुळे वारंवार त्यापासून तयार केलेले खाण्यात असल्यास लठ्ठपणा आजार जडतो.

बरेचजण पोट भरण्यासाठी दिवसातून दोन-तीन वेळा ब्रेड खातात. पण यामुळे भूक कधीच शमत नाही. उलट यामध्ये कार्बोहाइड्रेटचे प्रमाण जास्त असल्यामुळे पोट भरल्याची जाणीव होत नाही आणि अधिक अन्न खाल्ले जाते. **याबरोबरच ब्रेडमध्ये जास्त प्रमाणात ग्लूटेन** असते. तेदेखील अनारोग्याचे कारण ठरते. सतत ब्रेड खाल्ल्याने पोटात जास्त प्रमाणात आरोग्यासाठी हानिकारक असते. ब्रेड जास्त प्रमाणात खाल्ल्याने रक्तातील साखरेची पातळी कधी जास्त आणि कधी कमी होते. हीसुद्धा मेंदूचे नुकसान घडवून आणण्यास कारक ठरु शकते.

शर्टमध्ये ठेवा वैविध्य

फॅशन पॅशन

दोस्तांनो, तुमच्या वॉर्डरोबमध्ये वैविध्यपूर्ण शर्ट असायला हवेत. एकाच प्रकारचे, टिपिकल शर्ट घालून कंटाळला असाल तर वेगवेगळ्या कॉलर्सचे, फॅशनचे हे शर्ट नक्की विकत घ्या.

❊ तुमच्यावाडे मॅंडरिन कॉलरचा शर्ट असायला हवा. या कॉलरचा आकार तुमच्या नेहमीच्या कॉलरपेक्षा लहान असतो. मॅंडरिन कॉलर चोकर कॉलर म्हणूनही ओळखली जाते. असे शर्ट ट्राउझर्ससोबत खूप छान दिसतात.

❊ फॉर्मल ऑकेजनसाठी ऑक्सफर्ड बटन डाउन शर्ट तुमच्याकडे असायला हवा. अर्थात हे शर्ट कॅज्युअल ऑकेजनलाही चालून जातात. हे शर्ट जीन्स किंवा चिनोजवर कॅरी करता येतील.

❊ क्युबन कॉलरची फॅशन परत आली आहे. ही पारंपरिक फॅशन तुम्हीही जपायला हवी. फॅशनच्या बाबतीत अधिक जागरुक असाल तर क्युबन कॉलरवाला शर्ट नक्की विकत घ्या. क्युबन कॉलरचे प्रिंटेड शर्ट कमाल दिसतात.

❊ पीटर पॅन कॉलर हा प्रकारही उत्तम आहे. थोडं हटके किंवा वेगळं घालण्याची आवड असेल तर तुम्ही पॅन कॉलरचे शर्ट घेऊ शकता. टी शर्टवर लेअरिंग करायचं असेल तर तुम्ही या कॉलरचे शर्ट घ्या.

❊ तुमच्या फॅशनला ट्रेडिशनची विनार हवी असेल तर कुर्ता शर्ट कॅरी करायला हरकत नाही. कॅज्युअल विशेष प्रसंगी किंवा कोणत्याही समारंभाला तुम्ही हा शर्ट कुर्ता घालू शकता. जीन्स आणि कुर्ता हे सुद्धा हटके कॉम्बिनेशन आहे.

अध्ययनातील संधी

वेगळ्या वाटा

मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी किंवा इंजिनिअरींची मास्टर्स पदवी मिळवल्यानंतर नोकरीच्या बऱ्याच संधी उपलब्ध होतात. मात्र अनेकजण अधिक चांगल्या संधींच्या अपेक्षेने उच्च शिक्षण घेण्याचा निर्णय घेतात. एमटेक किंवा एमई केल्यानंतर विद्यार्थी नोकरी करू शकतात किंवा पीएचडी मिळवून पुढे जाऊ शकतात. अध्ययनाच्या क्षेत्रात करीअर करू इच्छिणारे, संशोधन क्षेत्रात जाणारे तसंच एखाद्या कंपनीच्या विकासाला हातभार लावू इच्छिणारे विद्यार्थी इंजिनिअरींगमध्ये पीएचडी करू शकतात. एमटेकचा किंवा दुसरा कोणताही विषय घेऊन तुम्ही पीएचडी करू शकता. इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीसारख्या संस्था पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना फेलोशिप्स देतात. यासोबतच विद्यापीठ अनुदान आयोगास इतर काही सरकारी विभाग, खाजगी संस्थांकडून पीएचडीसाठी शिष्यवृत्ती मिळू शकते. याबाबत तुम्ही माहिती घेऊ शकता.

बीटेक आणि एमटेक केल्यानंतर बहुसंख्य विद्यार्थी चांगल्या कंपनीत नोकरी बघतात. रिसर्च आणि डेव्हलपमेंट, मॅन्युफॅक्चरिंग आणि आयटी कंपन्यांसह विविध कंपन्यांमध्ये रिसर्च असोसिएट, सीनियर इंजिनिअर, प्रोजेक्ट मॅनेजरसारख्या पदांवर काम करता येईल. देशात चांगल्या प्राध्यापकांची गरज लक्षात घेता तुम्ही या क्षेत्राहीं जाऊ शकता. याशिवाय स्वत:ची कंपनी सुरू करण्याचा विचारही करता येईल. सध्या स्टार्ट अप्सनाही चांगली मागणी आहे.

चला ट्रेकिंगला

भटकंती

अनेक जण पावसाळ्यात ट्रेकिंगला निघतात. सध्याच्या काळात कुठेही फिरायला जाताना दहा वेळा विचार करावा लागतो. गर्दीची ठिकाणं टाळावी लागतात. मात्र भारतात काही ऑफबीट आणि कमी गर्दीची ठिकाणं आहेत. तुम्हीही ट्रेकिंगला जाण्याच्या विचारात असाल तर या ठिकाणांचा विचार करता येईल.

❊ ट्रेकिंगसाठी बराच वेळ असेल किंवा मोठी सुट्टी घेऊन फिरायला गेला असाल तर पिन पार्वती ट्रेकला जाता येईल. हा ट्रेक ११ दिवसांचा आहे. हा तसा कठीण ट्रेक आहे. त्यामुळे शक्यतो अनुभवी ट्रेकर्सनी या ट्रेकला जाण्याचा सल्ला दिला जातो.

❊ चादर ट्रेकही प्रसिद्ध आहे. हा ट्रेक पूर्ण करण्यासाठी नऊ दिवस लागतात. हौशी ट्रेकर्स या ट्रेकचा आनंद लुटू शकतात.

❊ सिक्किममध्ये गोएचला ट्रेक आहे. अत्यंत सुंदर अशा या मार्गावरुन ट्रेकिंगचा निराळा आनंद घेता येतो. गोएचला ट्रेकदरम्यान कांजनजंगा पर्वतरांगांचं दर्शन घेता येतं. ट्रेकिंगदरम्यान थोडं धाडस करायचं असेल तर गोएचलाला जाता येईल.

❊ तुम्ही स्ट्रोक कांगडी ट्रेकिंगची मजा लुटू शकता. अनुभवी ट्रेकर्स स्ट्रोक कांगडी ट्रेकला जाऊ शकतात. या ट्रेकसाठी आठ दिवस राखून ठेवणं आवश्यक आहे. स्ट्रोक कांगडी ट्रेकही कठीण आहे. त्यामुळे अनुभव असेल तरच हा ट्रेक करण्याचं धाडस करावं.

तू शांत रहा

मेंचं मेकिंग

२६ वर्षांची तरुणी असून स्वत:च्या पायांवर उभी आहे. मध्ल्या काळात माझी बरीच ब्रेक अप्स झाली. या ब्रेक अप्सचा माझ्या मनावर खोलवर परिणाम झाला नसला तरी थोडेफार ओरखडे उमटले. पण मध्यंतरी माझं पुन्हा ब्रेक अप झालं. पाच महिन्यांचं नातं मी संपवलं. यामुळे माझा प्रेमावरचा विश्वासच उडाला. पुन्हा काही नाती जोडण्याचा प्रयत्न केला. पण त्यात काही अर्थ नव्हता. मग मी लग्न करायचं ठरवलं. काही मॅट्रिमोनियल ॲप्स डाउनलोड केली. चांगला जोडीदार शोधण्याचा प्रयत्न केला. पण मला अपयश आलं. यामुळे माझा लग्नावरही विश्वास राहिलेला नाही. लोक मला अजून गोंधळात टाकतात. मी काय करू?

उत्तर : योग्य जोडीदार शोधण्यात आलेल्या अपयशामुळे तू निराश झाली आहेस. मुळात दोष तुझ्यात नाही पण तुला अजूनही मनाजोगा जोडीदार मिळालेला नाही. अशा परिस्थितीत नैराश्य येणं अगदी स्वाभाविक आहे. प्रत्येक माणसाचं मत वेगळं असू शकतं. प्रत्येकजण आपल्या अनुभवानुसार बोलत असतो. त्यामुळे तू शांत रहा. धीर धर. सुयोग्य जोडीदाराचा शोध घेत रहा. प्रेम आणि लग्नसंस्थेवरचा विश्वास ढळू देऊ नकोस. तुझ्या आयुष्यातही नक्कीच प्रेम फुलेल.

जोश

शेर की जुबानी

कई बार बिना गलती के भी
गलती मान लेते हैं हम,
क्यूंकी डर लगता है की
कोई अपना हमसे रूठ ना जाए।

शफक हो, फूल हो, शबनम हो,
माहताब हो तुम,
नहीं जवाब तुम्हारा
के लाजवाब हो तुम।

कभी बेपनाह बरसी, कभी गुम सी है
ये बेपनाह बारिश भी, कुछ कुछ तुम सी है।

नवे काही

सर्वात स्वस्त, तरीही मस्त

विवाने आपला नवीन ५ जी स्मार्टफोन बाजारात आणला आहे. या फोनमध्ये अनेक दमदार फीचर्स मिळतील. 'विवा टी ३ लाईट ५ जी' हा ब्रँडचा सर्वात स्वस्त ५ जी फोन आहे. या फोनच्या वैशिष्ट्यांबद्दल तपशीलवार जाणून घ्यायचे तर या फोनमध्ये ८ एमपी कॅमेरा आणि ६३०० प्रोसेसर आहे. ९० एचझेड रिफ्रेश रेटस्ह एलसीडी स्क्रीनही देण्यात आला आहे. यात ४ जीबी रॅम आणि ६ जीबी रॅम असे दोन पर्याय असतील. हा स्मार्टफोन १५० एमपी मुख्य लेन्स आणि ड्युअल कॅमेरा सेटअपसह येतो. मायक्रो एसडी कार्डच्या मदतीने स्टोरेज वाढवताही येते. कंपनीने फ्रंटला ८ एमपी सेल्फी कॅमेरा दिला आहे. उर्जा प्रदान करण्यासाठी ५००० एमएच्च बॅटरी पॅक देण्यात आला आहे. हा फोन १५ वॅट फास्ट चार्जिंगला सपोर्ट करतो.

सोशल मीडिया

जाहिरातींना लावा चाप

यू ट्यूबवर व्हिडिओ बघताना मधे येणाऱ्या जाहिरातीं मूळचा विचका करतात. मात्र या जाहिराती ब्लॉक करता येतात. यासाठी काय करता येईल? जाणून घेऊ. प्रथम गूगल क्रोम ओपन करा. त्यानंतर ॲडब्लॉकर एक्सटेंशन क्रोम सर्च करा. नवी विंडो ओपन करा. यात ॲड ब्लॉक, बेस्ट ॲड ब्लॉकर हे पर्याय दिसतील. त्यावर क्लिक करा. यानंतर अजून एक विंडो ओपन होईल. इथे ॲड टू क्रोमचा पर्याय मिळेल. त्यावर क्लिक केल्यानंतर एक फाईल डाउनलोड होईल. ही फाईल ओपन करा. यानंतर नवं एक्सटेंशन क्रोममध्ये जोडलं जाईल. आता तुम्ही कोणत्याही अडथळ्याशिवाय यू ट्यूबवर व्हिडिओ बघू शकता.

कार अँड बाईक

वेस्पाची स्पेशल ड्रॅगन एडिशन

अलिकडेच वेस्पा ९४६ ड्रॅगन एडिशन भारतीय बाजारात लॉन्च करण्यात आली आहे. तिची एक्स-शोरूम किंमत १४.२७ लाख रुपये इतकी आहे. ही एक विशेष आवृत्ती जागतिक स्तरावर केवळ १,८८८ ग्राहकांसाठी उपलब्ध असेल. भारतातील मोटोव्लेक्स डीलरशिपवर या आवृत्तीचे बुकिंग सुरू करण्यात आले आहे. वेस्पा ९४६ स्कूटरवर आधारित ही आवृत्ती नवीन पेंट आणि अन्य वैशिष्ट्यांमुळे बरीच अनोखी आहे. गाडीचा बाहेरचा भाग हलक्या सोनेरी रंगात रंगवला आहे. यात एमराल्ड ग्रीन कलरमध्ये ड्रॅगन ग्राफिक्स देखील असून ते समोरच्या ऐंप्रनपासून साइड पॅनल्सपर्यंत पसरलेले आहेत. ब्रेकिंगसाठी ड्युअल-चॅनल एबीएस सिस्टमसह दोन्ही टोकांना डिस्क ब्रेक आहेत. स्कूटरच्या दोन्ही टोकांना १२ इंच चाके आहेत तर इंधन टाकीची क्षमता आठ लिटर आहे.

भविष्यवेध

अंतराळात जायचेय?

अमेरिकास्थित स्पेस एक्सप्लोरेशन अँड रिसर्च एजन्सी (सेरा-) ने ब्लू ओरिजिनसोबत भागीदारी केल्यानंतर एक मोठी घोषणा केली आहे. याअंतर्गत भारतीयांनाही अंतराळात जाण्याची संधी मिळू शकते. भारत या कंपनीच्या विशेष मानवी अंतराळ उड्डाण कार्यक्रमाचा भागीदार देश असल्याचे हे फलित आहे. या कार्यक्रमांतर्गत मोजके अंतराळवीर अवकाशात पाठवणाऱ्या देशांना ही विशेष संधी मिळणार आहे. सेरा जगभरातील विविध देशांमधून एकूण सहा जागा बुक करेल. हे भविष्यातील मिशन अमेझॉनचे संस्थापक जेफ बेझोस यांच्या ब्लू ओरिजिन रीयुजेबल रॉकेटने पूर्ण केले जाईल. यात ११ मिनिटांच्या अंतराळ प्रवासाचा अनुभव घेता येणार आहे. यात सहभागी होण्यासाठी भारतीय नागरिकांना २०९ रुपये इतके नोंदणीशुल्क ठेवण्यात आले आहे.

यम्मी बेबीकॉर्न

झटपट रेसिपी

मित्रांनो, पावसाळ्यात काही तरी चमचमीत, चटकदार खावंसं वाटतं. त्याच त्या भाज्या खाऊन कंटाळाही येतो. अशा वेळी तुम्ही मस्तपैकी चिली बेबीकॉर्न बनवू शकता. वेगळी भाजी म्हणून चिली बेबीकॉर्न ट्राय करता येईल.

साम्रीः बेबीकॉर्न, दोन हिरव्या मिरच्या, एक कांदा, एक मध्यम आकाराची भोपळी मिरची, पाव छोटा चमचा हळद, अर्धा छोटा चमचा लाल तिखट, चमचाभर जिरेपूड, पाव चमचा मिरपूड, पाव चमचा गरम मसाला, दोन चमचे तेल, चवीनुसार मीठ

कृतीः बेबी कॉर्न स्वच्छ धुवून तुमच्या आवडीप्रमाणे आकारात कापून घ्या. कांदा बारीक चिरून घ्या. भोपळ्या मिरचीचे थोडे लांबट तुकडे करा. आता कढईत तेल गरम करून घ्या. त्यात कांदा परतून घ्या. त्यात बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या, भोपळी मिरची, हळद, तिखट, जिरेपूड, मिरपूड, गरम मसाला घालून नीट हलवून घ्या. मग चवीनुसार मीठ घाला. या मसाल्यात बेबीकॉर्न घालून नीट हलवून घ्या. मसाला सर्व बेबीकॉर्नला लागायला हवा. आता बेबीकॉर्न मंद आचेवर चार ते पाच मिनिटं शिजवून घ्या. गॅस बंद करा. चिली बेबीकॉर्न तयार आहे. कोथिंबिरीने सजावट करा. हा प्रकार तुम्ही फ्राईड राईस किंवा कोणत्याही भातासोबत खाऊ शकता.

पोलीस भरती झालेल्या उमेदवारांची व्हिडिओ रेकॉर्डिंगद्वारे वैद्यकीय तपासणी करावी अन्यथा अधिकाऱ्यांच्या खुर्चीचा 'श्राद्ध' घालणार

अन फिटचे फिट करून घेतलेले उमेदवार सेवेत रूजू

नगर – नुकत्याच झालेल्या पोलीस भरतीच्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी व्हिडिओ रेकॉर्डिंग द्वारे घेण्यात यावी व वैद्यकीय तपासणी दरम्यान अनेक एजंटांचा सुळसुळाट असतो तो थांबवावा, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना तपासणी दरम्यान परिसरात फिरकू न देण्यात यावे, या मागणीसाठी जिल्हा रुग्णालय वैद्यकीय अधिकारी यांना गणेश केदारे यांनी निवेदन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, जिल्हा रुग्णालयाच्या कार्यालयातील काही कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचारी हे पोलीस भरती झालेल्या उमेदवाराकडून अन फिट असताना देखील पैसे घेऊन त्यांना फिट असल्याचे प्रमाणपत्र देतात आज आपल्या कार्यालयाच्या कृपेने अहमदनगर पोलीस दलात दृष्टीदोष तिरळेपणा, रात आंधळेपणा, गुडघ्यास गुडघे लागणे, सपाट तळवे, बोबडेपण हे सर्व उमेदवार आज सेवेत आहे. तरी आपल्या पदाचा योग्य तो वापर करून पोलीस भरती झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी ही पारदर्शक व्हावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली असुन सर्व भरती झालेल्या उमेदवारांना एकाच दिवशी न बोलावता आपल्या योग्यतेनुसार उमेदवारांना गट करून बोलवावे तसेच भरती उमेदवारांचे आपल्या दवाखान्यात अद्यावत मशनरी नसल्यामुळे खाजगी डोळ्याच्या दवाखान्यात मशीनद्वारे तपासणी करूनच पात्र अपात्र करावे, भरती उमेदवारांचे वैद्यकीय तपासणी चालू असताना सेवानिवृत्त कर्मचारी अथवा एजंटना परिसरात बंदी घालण्यात यावी तसेच प्रत्येक उमेदवारांचे मेडिकल वैद्यकीय चाचणी ही व्हिडिओ रेकॉर्डिंग द्वारे घेण्यात यावी तसेच सर्व उमेदवारांची तपासणी ही वैद्यकीय अधिकारी यांनीच करावी अन्यथा जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी यांच्या खुर्चीचा श्राद्ध घालण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

शहरातील नागरिकांनी पिण्याचे पाणी उकळून घ्यावे

नगर – अहमदनगर शहरास पाणी पुरवठा होत असलेल्या मुळाधरण पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरु असून धरणात नवीन पाण्याची आवक सुरू झालेली आहे. नव्याने आवक झालेले पाणी गढूळ आहे व हे पाणी पूर्वीच्या पाण्यात मिसळल्याने सर्व पाणी कमी–जास्त प्रमाणात गढूळ झालेले असते.

त्या दृष्टीने महानगरपालिकेमार्फत विळद जलशुध्दीकरण प्रकल्प व वसंतटेकडी जलकुंभ येथे तुरटी व क्लोरीनची मात्रा वाढवण्यात आलेली आहे. परंतू जलशुध्दीकरण प्रक्रियानंतरही हे पिण्यायोग्य पाणी नागरिकांना कही प्रमाणात गढूळ पाण्याचा पुरवठा होण्याची शक्यता नाकारता येत नाही व त्यामुळे पावसाळ्यात होणाऱ्या जलजन्य आजाराची शक्यता लक्षात घेता, पिण्याचे पाणी उकळून पिणे आरोग्यासाठी हितकारक ठरते. नागरीकांनी पिण्यासाठीचे पाणी उकळून प्यावे व व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

मोहरम विसर्जन मिरवणुक मार्गाची पाहणी

नगर शहरात १७ जुलै रोजी निघणाऱ्या मोहरम विसर्जन मिरवणूक व त्या अगोदर निघणाऱ्या कत्तलची रात्र मिरवणूक मार्गाची शहर विभागाचे पोलिस उपअधीक्षक अमोल भारती, कोतवालीचे पोलिस निरीक्षक प्रताप दराडे, तोफखान्याचे पोलिस निरीक्षक आनंद कोकरे यांनी पोलिस पथकासह मंगळवारी (दि.९) पाहणी केली. (छाया – धनेश कटारिया)

चिचोंडी पाटीलच्या उपसरपंचपदी सौ.यशोदा कोकाटे यांची निवड

नगर – नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील ग्रामपंचायतच्या रिक्त झालेल्या उपसरपंचपदी सौ. यशोदा विक्रसागर कोकाटे यांची बहुमताने निवड झाली. माजी सभापती इंजि.प्रविण कोकाटे व सरपंच शरद पवार यांच्या गटाकडून यशोदा विक्रसागर कोकाटे यांनी उपसरपंच पदाच्या निवडणुकीसाठी अर्ज भरला होता व विरोधी गटाकडून अशोक रामदास कोकाटे यांनी अर्ज दाखल केला होता.

चिचोंडी पाटील च्या उपसरपंच पदी सौ.यशोदा कोकाटे यांची निवड झाल्यावर त्यांचा सन्मान करताना गावातील नेते व ग्रामस्थ.

या निवडणुकीमध्ये यशोदा कोकाटे यांना आठ मते मिळाली तर विरोधी उमेदवारास सहा मते मिळाली. एक सदस्य गैरहजर होता. दोन मते जादा मिळवून यशोदा कोकाटे उपसरपंचपदी विराजमान झाल्या. या निवडीबद्दल ग्रामस्थांकडून मोठा जल्लोष करण्यात आला.

नवनिर्वाचित उपसरपंच सौ.यशोदा कोकाटे यांचा सन्मान माजी सभापती इंजि.प्रविण कोकाटे, सरपंच शरद पवार, शिक्षक नेते आबासाहेब कोकाटे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सेवा सोसायटीचे चेअरमन महादेव खडके, माजी सरपंच पांडुरंग कोकाटे, मच्छिंद्र खडके, शंकर पवार, आप्पासाहेब पवार, माजी चेअरमन डॉ.मारुती ससे,माजी सरपंच दिलीप पवार, सोसायटी संचालक पंडित कोकाटे, काशिनाथ बेल्हेकर, अंबादास फिसके, संदीप कोकाटे, बबन कोकाटे, चंद्रकांत सदाफुले, माजी चेअरमन विठ्ठल कोकाटे, व्हा.चेअरमन अर्जुन वाडेकर, काशिनाथ वाडेकर, माजी चेअरमन सुरेश ठोंबरे, माजी उपसरपंच भाऊसाहेब ठोंबरे, महादजी कोकाटे, ग्रामपंचायत सदस्य गवांडे, रमेश कुलथे, गोरख वाडेकर, दिपक कांबळे, रमेश वामन, दत्तात्रय शेळके, नानासाहेब कोकाटे, मोहन वाळके, मंगेश कोकाटे, प्रशांत कांबळे, संजय कोकाटे, योगेश हजारे, बाबा शेंडकर, राजेंद्र कोकाटे, लक्ष्मण कोकाटे, विजय कोकाटे, खुशाल पवार, संजय पवार, किरण वाटाडे, अमोल काकडे, बाळकृष्ण कोकाटे, अनिल चव्हाण, शंकर गवांडे, बाबासाहेब विधाते, शिवाजी भद्रे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

दत्तू धुळे, माऊली ठोंबरे, संदीप काळे, प्रकाश कांबळे, उद्योजक चंद्रकांत पवार, संतोष कोकाटे, पै.राजू कोकाटे, भाऊसाहेब वाडेकर, गणेश वाडेकर,संभाजी परकाळे, प्रशांत मुटकुळे,रामा काळे, प्रशांत कांबळे, अण्णासाहेब कोकाटे, बाबासाहेब परकाळे, पोपट कोकाटे, भगवान पवार, बाबासाहेब बेल्हेकर, रामदास कोकाटे, अशोक कोकाटे, बाळासाहेब पवार, मोहन तनपुरे, जयसिंग दळवी, अजय कांकरिया, युवराज हजारे, कुमार चांदुखे, किरण मोरे, माणिक ठोंबरे, मंगेश कोकाटे, शरद कोकाटे, गणेश

विधानसभा उमेदवारीसाठी काँग्रेसने इच्छुक उमेदवारांकडून मागवले अर्ज

नगर – राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून विधानसभा निवडणुकीची तयारी युद्धपातळीवर सुरु असून विधानसभेच्या दृष्टीने रणनीती आखण्यासाठी प्रदेश कार्यालयात बैठकावर बैठका घेण्यात येत आहेत.

लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला महाराष्ट्रात घवघवीत यश मिळून काँग्रेस इतर पक्षांच्या मानाने एक नंबरला आल्याने काँग्रेसचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण आहे. ऑक्टोबरमध्ये होत असलेल्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने काँग्रेस प्रदेशअध्यक्ष नाना पटोले यांच्यासह राज्यातील काँग्रेसच्या सर्व जिल्हा अध्यक्षांना प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील इच्छुक उमेदवारांचे उमेदवारी अर्ज भरून घेण्यासंदर्भात व इच्छुक उमेदवारांनी १० ऑगस्ट पर्यंत प्रदेश कार्यालयात संपर्क साधण्यासंदर्भात पत्राद्वारे सूचना दिलेल्या आहेत. तसे पत्र नाना पटोलेंच्या आदेशानुसार प्रदेश उपाध्यक्ष तथा प्रशासन संघटक नाना गवांडे यांच्या स्वाक्षरीने काढले आहे..

लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने अतिशय चांगली कामगिरी करत महाराष्ट्रातून इतर पक्षांच्या मानाने सर्वात जास्त खासदार केंद्रात दिलेले आहेत त्यामुळे काँग्रेस नंबर एकचा पक्ष ठरला आहे त्यामुळेच विधानसभा निवडणुकीत जास्त जागा काँग्रेसला अपेक्षित असल्याचे काँग्रेसच्या राष्ट्रीय समन्वयक मंगल भुजबळ यांनी म्हटलं आहे. त्यानुसार विधानसभा लढण्यास इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी प्रदेश कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन प्रदेश कार्यालयाकडून करण्यात आले आहे. ज्या उमेदवारांचे उमेदवारी अर्ज येतील त्यांच्यांचे नावाचा विचार पक्षाकडून होईल असेही सांगण्यात आले आहे.

'ओंकार संगीत निकेतन'ची विद्यार्थिनी रिद्धी मेहेरचे गायन परीक्षेत विशेष प्राविण्य

नगर – अखिल भारतीय गांधर्व मंडळाने नुकत्याच घेतलेल्या परीक्षेमध्ये मिंगार येथील ओंकार संगीत निकेतनची विद्यार्थिनी रिद्धी अमित मेहेर हिने गायन प्रारंभिक परीक्षेत विशेष योग्यता प्राप्त केली आहे. यासाठी त्यांना मार्गदर्शन सौ. संगीता देऊळगावकर यांचे लाभले आहे. रिद्धी सेझेड हार्ट कॉन्व्हेंट शाळेमध्ये इयत्ता सातवी मध्ये शिकत आहे. तिच्या या यशाबद्दल प्राचार्य करुणा, आनंदधाम धार्मिक परीक्षा बोर्डचे पदाधिकारी यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

ओंकार संगीत निकेतची रोशनी बोरा गायन परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

नगर – अखिल भारतीय गांधर्व मंडळाने नुकत्याच घेतलेल्या परीक्षेमध्ये मिंगार येथील ओंकार संगीत निकेतनची विद्यार्थिनी रोशनी बोरा गायन प्रारंभिक परीक्षेत प्रथम श्रेणीत यश प्राप्त केली आहे. यासाठी तिला मार्गदर्शन सौ. संगीता देऊळगावकर यांचे लाभले आहे. रिद्धी सिझेट हार्ट कॉन्व्हेंट शाळेमध्ये इयत्ता आठवीमध्ये शिकत असून तिच्या या यशाबद्दल प्राचार्य श्रीमती करुणा आनंदधाम धार्मिक परीक्षा बोर्डचे पदाधिकारी यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

सामाजिक संवेदना जागरुक ठेऊन वाटचाल केल्यास आत्मिक समाधान

नायब तहसिलदार अनिलराव तोरडमल यांचे प्रतिपादन

नगर – मनुष्य किती जगला यापेक्षा तो कसा जगला? याकडे समाज बघतो. सामाजिक संवेदना जागरुक ठेऊन वाटचाल केल्यास आत्मिक समाधान मिळते. कमाने परमार्थ घडतो, यासाठी कर्म चांगले असणे गरजेचे आहे. शरीर सदृढ असल्यास प्रत्येक क्षेत्रात यश गाठता येते. तर व्यायामाने मन प्रफुल्लीत होऊन बुध्दी एकाग्र होते. हरदिन मॉर्निंग ग्रुपची पर्यावरण संवर्धन व आरोग्य चळवळ समाजाला दिशा देणारी असल्याचे नायब तहसीलदार अनिलराव तोरडमल यांनी सांगितले.

वृक्षरोपणाने पर्यावरण संवर्धन व योग–प्राणायामाने सदृढ आरोग्याची चळवळ चालविणाऱ्या हरदिन मॉर्निंग ग्रुपचा रौप्य महोत्सवी स्थापना दिवस आरोग्याचा जागर करुन करुन साजरा करण्यात आला. तर विविध क्षेत्रात यश प्राप्त करणाऱ्या ग्रुपचे सदस्य व त्यांच्या गुणवंत पाल्यांचे सत्कार करण्यात आले.

मिंगार येथील देशमुख सांस्कृतिक भवनमध्ये झालेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार अनिलराव तोरडमल, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग श्रीगोंदाचे उपअभियंता गणेश भोसले, पीएसआयपदी निवड झालेले आंतरराष्ट्रीय धावपटू पूजा वराडे, उद्योजक लॉरेन्स स्वामी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रास्ताविकात हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांनी हरदिनचे पाचशे पेक्षा जास्त सभासद आरोग्य व पर्यावरण चळवळीत योगदान देत आहे. तर मरजू घटकांना आधार देण्याचे कार्य सातत्याने सुरु आहे. वर्धमर वृक्षरोपण, स्वच्छता अभियान, योग शिबिर, मरजू विद्यार्थ्यांना मदत आदी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असल्याची त्यांनी माहिती दिली.

प्रारंभी दिपप्रज्वलाने कार्यक्रमाचे प्रारंभ झाले. ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे यांचे आरोग्य विषयावर प्रवचन झाले. त्यांनी उपस्थितांना सुदृढ आरोग्यासाठी जागरूक राहण्याचे आवाहन केले.

सेवापूर्ती बद्दल एस.टी. महामंडळातून सेवानिवृत्त झालेले शेषराव पालवे, लष्करातून सेवानिवृत्त झालेले स्तिताराम परदेशी, हाज यात्रा करणारे प्रा. सलाबत खान, साऊथ आफ्रिका येथे काँक्रेड मॅरेथॉन पूर्ण करणारे योगेश खरुडे, तबलावादनात विशेष नैपुण्य मिळविणारे वेदांत केदारे, पुरस्कार प्राप्त शर्मिला मेहेत्रे, ज्योतिषाचार्य तुषार धाडगे, अकाऊंट सेक्टर मधील क्लास वन अधिकारीची परीक्षा उत्तीर्ण झालेली स्नेहा खोत, पीएसआय झालेली पूजा वराडे, दहावीतील गुणवंत श्रावणी कटोरे यांचा सत्कार करण्यात आला.

हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या रौप्यमहोत्सवी स्थापना दिवस, आरोग्याचा जागर करुन साजरा करताना नायब तहसीलदार अनिलराव तोडमल. समवेत उपअभियंता गणेश भोसले, धावपटू पूजा वराडे, लॉरेन्स स्वामी, अध्यक्ष संजय सपकाळ, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे आदी.

हरदिन मॉर्निंग ग्रुपचा रौप्य महोत्सवी स्थापना दिवस आरोग्याचा जागर करुन साजरा

महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या निवडणुकीत बिनविरोध झालेले सुंदरलाल भंडारी, कांतीलाल बोरा, नितीन शिंगवी, सुशील भंडारी, विनोद भंडारी, पवन गुंदेचा, सनी मुनोत, सुदाम गांधले, शंकरराव हिरणावाळे, वैशाली बोरा तसेच महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेतील नूतन संचालक शिवाजीराव बनकर, अशोक ढळवी आणि ज्येष्ठ नागरिक संघाचे विठ्ठलराव लोखंडे, सुभाष होडगे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी जालिंदर बोरुडे, सुमेश केदारे, जहीर सय्यद, रमेश वराडे, दिलीपराव ठोकळ, सर्वेश सपकाळ, सचिन चोपडा, दिलीप गुगळे, अभिजीत सपकाळ, दीपक धाडगे, अशोकराव परते, मनोहर दरवडे, दीपक बडदे, अनंत सदलापूर, एकनाथ जगताप, दशरथराव मुंडे, पोपट भांड, नामदेव जावळे, सुभाष वेंढूरकर, जालिंदर अळकुटे, राजू कांबळे, प्रांजली सपकाळ, सुनीता वराडे, सीमा केदारे, संगिता सपकाळ, रेवत्या परदेशी, उषा ठोकळ, संगीता दरवडे, मीना ससाणे, आशाताई पराते, वंदना मेहेत्रे, आरतीताई बोरुडे, स्नेहल दरवडे आदींसह ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

ग्रुपमधील सदस्यांची डॉ. सोमेश्वर गायकवाड यांनी मधुमेह व हृदयरोग तपासणी केली. त्याचप्रमाणे डॉ. अकबर मनियार, डॉ. प्रवीण साबळे, डॉ. अमित पठारे आदींसह मुथा हॉस्पिटलच्या टिमने उच्च रक्तदाब, मधुमेह आदी विविध आरोग्य तपासणी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज आनावडे यांनी केले. आभार एकनाथ जगताप यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सूर्यकांत कटोरे, रमेश खंडेलवाल, दिलीप बोंदर्डे, बाळू पाटील, सचिन वेंढूरकर, अतुल वराडे, संजय नायडू, सरदारसिंग परदेशी, अनिल सोळसे, अविनाश जाधव, अविनाश पोतदार, संजय मिंगारदिवे, रमेश कोठारी, जयकुमार मुनोत, सिद्धेश्वर पारेकर, अविनाश काळे आदींनी परिश्रम घेतले.

इतिहासाचा वारसा जोपासत विकसित शहर निर्माण करायचें : आमदार संग्राम जगताप

नगर – समाजामध्ये काम करीत असताना वैचारिक बांधिलकी जोपासत चांगले काम उभे करणे गरजेचे आहे. शहर विकासासाठी नागरिकांनी मतरुपी काम करण्याची संधी दिली आहे. त्या माध्यमातून नियोजनबद्ध व कायम स्वरूपीच्या विकासाला गती दिली आहे. माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी नेहमीच चांगल्या विचारातून नवनवीन संकल्पना समाजासमोर मांडण्याचे काम केले आहे. शहराला ५०० वर्षाचा महान इतिहास आहे तो एकत्रित मांडण्याचे काम केले आहे. इतिहासकार भूषण देशमुख आपल्या शहराचे ब्रँडिंग करत असून खरा इतिहास जोपासत समाजासमोर आणण्याचे काम करत आहे. बुरुडगाव रोड येथे साकारण्यात आलेला इतिहास आजच्या युवा पिढीला ऊर्जा व प्रेरणा देत राहील. विकास कामातून शहरांमध्ये शांतता व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याचे काम केले आहे, त्यामुळेच शहर विस्तारीकरणाला वाव मिळाला. नकाशावरचे रस्ते प्रत्यक्षात साकारले. त्यामुळे नागरिकांचा दळणवळणाचा प्रश्न देखील मार्गी लावला. विकासाचा वारसा जोपासत विकसित शहर निर्माण करण्याचे काम सुरु आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले

बुरुडगाव रोड आयटीआय गेट शेजारील भिंतीवर साकारलेल्या ऐतिहासिक चित्रांचा लोकार्पण सोहळा

बुरुडगाव रोड आयटीआय गेट शेजारील भिंतीवर साकारलेल्या ऐतिहासिक चित्रांचे लोकार्पण सोहळ्याप्रसंगी आ. संग्राम जगताप. समवेत गणेश भोसले, भूषण देशमुख, प्राचार्य के. ए. जागीरदार, प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, विपुल शेटीया आदी. दुसऱ्या छायाचित्रात प्रमागतीत उपस्थित नागरिक. (छाया – लहू दळवी)

बुरुडगाव रोड आयटीआय गेट शेजारील भिंतीवर साकारलेल्या ऐतिहासिक चित्रांचे लोकार्पण सोहळ्याप्रसंगी आ. संग्राम जगताप. समवेत गणेश भोसले, भूषण देशमुख, प्राचार्य के. ए. जागीरदार, प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, विपुल शेटीया, इंजि. श्रीकांत निंबाळकर, शिल्पकार सचिन विटणकर, अभिजीत चिप्पा, मुकेश मुळे, शहनवाज जहागीरदार, गौतम जायभाय, विनायक मुतकर, सतीश गुगळे, विजय फुलसौंदर, नामदेव भोसले, संतोष भोसले, सुनील भोसले आदीसह प्रमागतीत नागरिक उपस्थित होते

गणेश भोसले म्हणाले की, बुरुडगाव रोड परिसर विकास कामातून शांत, सुरक्षित, स्वच्छ आणि हरित झाला असल्यामुळे नागरिक मोठ्या प्रमाणे राहण्यासाठी येत आहे त्यामुळे रेसिडेन्सी भाग म्हणून ओळखला जात आहे. पूर्वी नागरिक सावेडी उपनगरामध्ये राहण्यासाठी पसंती देत होते. मात्र आता बुरुडगाव रोड भागाला पसंती देत आहे. नियोजनबद्ध विकास कामे केल्यामुळेच दप्यादप्याने सर्वच विकासाची कामे मार्गी लागले आहेत. आता पर्यटन विकासाला चालना मिळावी यासाठी म्युझिकल फाऊंटन, रस्त्यांचे सुशोभीकरण, ऐतिहासिक चित्रे निर्माण केले आहे. ही सर्व कामे मार्गी लावण्यासाठी आ. संग्राम जगताप यांचे मोठे सहकार्य आहे.

भूषण देशमुख यांच्या सूचनेनुसार नगर जिल्ह्याचा इतिहास एका प्रभागांमध्ये आणण्याचे काम केले आहे त्या माध्यमातून नगर शहराची ऐतिहासिक ओळख निर्माण होईल, असे प्रतिपादन गणेश भोसले यांनी केले

भूषण देशमुख म्हणाले की, नगर शहर हे एक महान असून याला इतिहासाचा मोठा वारसा लाभलेला आहे हे जोपासण्याचे काम आपल्या सर्वांना करावे लागणार आहे. गणेश भोसले यांच्या संकल्पनेनुसार भिंतीवर इतिहासाची रेखाटलेली चित्रे आजच्या युवा पिढीला मार्गदर्शक ठरेल. तसेच आ. संग्राम जगताप यांनी देखील चांगल्या कामाच्या पाठीमागे उभे राहत शहर विकासाला चालना दिली असल्याचे ते म्हणाले

प्राचार्य के. ए. जागीरदार म्हणाले की, शहरातील मूलभूत प्रश्नांपासून विकासाची कामे मार्गी लागली जात आहे म्हणूनच नवनवीन संकल्पना शहरात साकारत असलेल्या दिसत आहे. बुरुडगाव रोड परिसरात सर्वसामान्य नागरिकांसाठी हक्काचे हॉस्पिटल निर्माण होत आहे. त्याचबरोबर विद्यार्थी दशेमध्येच चांगला खेळाडू निर्माण व्हावा यासाठी सारसनगर येथे क्रीडा संकुल तयार होताना दिसत आहे. शहरांमधील विविध रस्त्यांची काँक्रिटीकरण व डांबरीकरणाची कामे सुरू असल्याचे दिसत आहे. या सर्व कामाच्या पाठीमागे आ. संग्राम जगताप असून ते खऱ्या अर्थाने शहर विकासाला गती देत आहे, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे यांनी केले तर सूत्रसंचालन सतीश गुगळे आणि आभार प्रदर्शन संजय चोपडा यांनी मानले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

पाहिजेत TVS

भारतात दुचाकी वाहन निर्मितीत अग्रेसर व सर्वात मोठी रेंज असलेल्या TVS या नामांकित कंपनी बरोबर काम करण्याची सुसंधी..
आपल्या करियरला द्या नवी उंची.. कंपनीच्या अहमदनगर येथील अधिकृत शोरूम साठी खालील जागा त्वरीत भरणे आहेत.

- पीडीआय टेक्निशियन आयटीआय, अनुभवी/क्रेशलेस प्राधान्य. (M)
- मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह कोणत्याही शाखेचा पदवीधर, अनुभवी/क्रेशलेस प्राधान्य. (M)
- डिजिटल कॉलिंग सीसीई कोणत्याही शाखेचा पदवीधर, अनुभवी/क्रेशलेस प्राधान्य. (M)
- बिलिंग/कॅशियर कोणत्याही शाखेचा पदवीधर, अनुभवी/क्रेशलेस व टॅली अत्यन्त प्राधान्य. (M/F)
- सर्व्हिस अॅडव्हायझर मेकॅनिकल डिप्लोमा/इंजिनिअर/आयटीआय अनुभवी किंवा फ्रेशर्स. (M/F)
- टेक्निशियन आयटीआय, अनुभवी/क्रेशलेस प्राधान्य. (M)
- फ्लोअर इनचार्ज कोणत्याही शाखेचा पदवीधर, मेकॅनिकल इंजिनिअर, अनुभवी/क्रेशलेस प्राधान्य.(M/F)
- फायनल इन्स्पेक्शन मेकॅनिकल इंजिनिअर, अनुभवी/क्रेशलेस प्राधान्य. (M)
- अकॉटंटस् बी.कॉम / टॅली आवश्यक / अनुभवीस प्राधान्य (M)

वरील जागेसाठी त्या क्षेत्रातील शिक्षण व अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य दिले जाईल. तसेच नवीन उमेदवारही अर्ज करू शकतात.
सेवा तत्परतेची.. परंपरा विश्वसनीयतेची..

भनसाळी TVS
सक्कर चौक, नगर-पुणे रोड, अहमदनगर
मोबा. : 9090 277277

वर पाहिजे

वधु-२६, ५.३ बी.ए.
हिंदु-ब्राह्मण समाज, प्रायव्हेट जॉब, बाबा नाही. १ भाऊ विवाहित, मुलीसाठी ब्राह्मण, जैन, मराठा, भंडारी व इतर हिंदू समाजातील वर चालेल.
- संपर्क -
7517057842
8421168826

फर्निचर साठी

लागणारे उच्च दर्जाचे
पाईनवूड
हजर स्टॉक मध्ये उपलब्ध
9823704000

पूर्व मुखी, २००० ते ३००० स्के.फू. रहिवासी प्लॉट किंवा मोकळी जागा विकत घेणे आहे
शहराच्या मध्यवर्ती भाग किंवा २ किलो मीटर परिसरात
7387306377

गाळा विकत पाहिजे

9881241060

रोडच्या गाळा भाड्याने देणे

शनिचौक, गुजरगल्ली, मिसाळ डेअरीसमोरील १०० स्क्वे.फुटाचा रोडच्या गाळा भाड्याने देणे आहे.
9763394050

गाळे,ऑफिस भाड्याने देणे

मार्केटयार्ड,अहमदनगर येथे शिवाजी महाराज पुतळ्याजवळ
9422220438

प्राईम लोकेशनला असलेला शॉप विकणे आहे

२५ मीटर जुना पिंपळगाव रोडवर ४०० चौ. फूट अकृष्ट इंटेरियर असलेला शॉप नंबर ४. शिरव्याग्निनी हेरिटेज, एकवीरा चौकाजवळ, माईन केअर हॉस्पिटल शेजारी.योग्य किंमत आव्हास विकणे आहे.
संपर्क : 7719037755

फक्त 15 मिनिटात सोने तारण कर्ज

9% व्याजदर
लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्या.
नागरी सेवेसाठी सदैव
7888219471, 94231 67850
बागडपट्टी, अहमदनगर

शुभ्र टक्के प्रोसेसिंग फी
प्रति तोळा ₹ 58000

550 sqft. Flat For Sale

नगर शहरात दिल्लीगेट रोडवर, न्यु आर्ट्स कॉलेज जवळ
550 स्के.फूटाचा फ्लॅट विकणे आहे
- संपर्क -
Mo. 9270570699

संतुजी कृषी फार्मचे प्रसिध्द निसर्ग जांभूळ

निसर्ग जांभूळ
आपल्या नगर शहरात
संपूर्णपणे नैसर्गिक पध्दतीने जोपासलेल्या बागेतील
जांभूळफळे
- १ किलो च्या पॅक मध्ये - 300/- रु किलो
- घरपोहोच सेवा उपलब्ध
✻ आमची प्रसिध्द उत्पादने ✻
जांभूळ सीड पावडर व जांभूळ वाईन
घरपोहोच मागविण्यासाठी आत्ताच संपर्क करा
मो. नं. 8262876581
वेबसाईट : www.nisargjambhul.com

मसाज व रुग्णसेवा होम सर्व्हिस

घरी येऊन प्रोफेशनल फुलबॉडी मसाज केली जाईल
शरीर फिट राहण्यासाठी केरला मसाज अत्यंत उपयोगी
अर्धांगवायु असलेले अतिवृद्ध व बेडवर असलेल्या रुग्णांना घरी येऊन सेवा दिली जाईल.
FULL BODY MASSAGE (मंगळी बेसेखर खुल्ला उपलब्ध)
9850127508 / 8830275190

डॉ.अद्वैत गिते

MBBS, MD (Medicine) DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
✻ चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
✻ पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
✻ डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरेटिस
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
✻ सर्व आजारांसाठी ऐडमिट सुविधा उपलब्ध.
✻ सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉन्फिक्स सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

१२/२४ तास लहान बाळ सांभाळण्यासाठी मुलगी/बाई पाहिजे

(वयोमर्यादा ५८ ते ४०)
संपर्क : 8888576576

चुकीची दुरुस्ती

दै.नवा मराठाच्या दि.१/४/२०२४ च्या अंकात पान क्र.५ वर अकबर अल्लाबक्ष तांबोळी यांची जाहिरात फॉर्म एन.डी. (नियम ९३ (३) पहा) या जाहिरातीमध्ये मोटार वाहन क्रमांक एम.एच-१६ जी.सी.८४४२ असे नजरचुकीने झाले आहे. त्याऐवजी मोटार वाहन क्रमांक एम.एच-१४ जी.सी.८८४२ असे वाचावे.

जैन सोशल फेडरेशन संचालित

आनंदऋषिजी हॉस्पिटल अॅण्ड हार्ट सर्जरी सेंटरचे आनंदऋषिजी इन्स्टिटयुट ऑफ नर्सिंग, अहमदनगर.
(भारतीय नर्सिंग कौन्सिल, नवी दिल्ली, महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ नर्सिंग अँण्ड पॅरामेडिकल एन्ट्रुकेशन, मुंबई व महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त)

नर्सिंग करियर निवडा व भविष्य उज्ज्वल, सुरक्षित बनवा..

१२ वी पास उमेदवारांकडून अर्ज मागवित आहोत.
ANM (Auxiliary Nurse Medwife)
कोर्स कालावधी - २ वर्षे
फॉर्म वाटप चालू आहे
नर्सिंग इन्स्टिटयुटची वैशिष्ट्ये -
- नवीन अद्ययावत इमारत, कॉलेज व हॉस्टेल एकाच छत्राखाली.
- सर्व सोयींनीयुक्त वर्ग, प्रयोगशाळा .
- अद्ययावत ग्रंथालय व दृकश्राव्य माध्यमे.
- उच्चविद्या विभुषित प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी.
- उत्कृष्ट परिचर्या व प्रात्यक्षिकांची सोय.
- स्वत:चे ३३० बेडचे रुग्णालय.
- अहमदनगरच्या अगदी मध्यवर्ती वसलेले बसस्टॅण्ड व रेल्वेस्टेशनच्या जवळ.

संपर्क
प्राचार्य
+ 91 99753 90092, 7447335107 (Swati Madam)
कार्यालय, फोन : (०२४१) २३४१०१९
सोमवार ते शुक्रवार - सकाळी ९ ते ४, शनिवार - सकाळी ९ ते १
१२४, आनंदऋषिजी मार्ग, अहमदनगर. E-mail : anandrishiji@rediffmail.com
✻ आमच्या येथे डोनेशन घेतले जात नाही.

Green Library

EARTH'S Greenery for Every Space
Fresh Environment with Indoor Plants
Get a Plant Today!
- Potted Planters
- Premium Planters
- Garden Accessories
- Garden Furniture
- Garden Lightings

Amit Sanklecha 99231 43334
Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

२१ जुलै २०२४ अयोध्या दर्शन यात्रा

काशी विश्वेश्वर, प्रयागराज, गया विश्वदर्शी यात्रा
प्रवास : १० दिवस
✻ प्रेक्षणीय स्थळे ✻
उज्जैन, अयोध्या, प्रयागराज, गया, वाराणसी, चित्रकूट, सती अनुसया, गुप्त गोदावरी, ओंकारेश्वर, शेगाव
✻ प्रतिव्यक्ती ✻
₹ 11601/-
2 x 2 आरामदायी स्लीपर कोच बसने प्रवास, निवास व भोजनासह
✻ दो कुशलतेने सारथ्य ✻
श्री सुविधा यात्रा कंपनी संचालित
✻ ३ ऐसी अतिरिक्त ✻
श्री. अमित संजयराव मुरुंबे
सौ. स्वरिका अमित मुरुंबे
मो. ९२२६१९०००, ९६०४०४०४०४
पुरोहित बंधूसेवा, निवासीय, अ.नगर
✻ २ ऐसी अतिरिक्त ✻
श्री. रामेश्वर सानपे
मो. ९८२२६१९०९९, ८२३०१०१०१०
सौ. ए. व. दीपक वैद्य, अयोध्या पालकमंत्री कार्यालय, पोलिसलाईन, नगरसेवक
✻ ३ ऐसी अतिरिक्त ✻
श्री. कुलदीप इलमकोडे
मो. ९८२२६१९०९९
सौ. ए. व. विक्रम वैद्य, अयोध्या विकास प्राधिकरण, नगरसेवक
AMAR PREM Holidays & Multiple services

सहावे पुण्यस्मरण

स्व. विकास कथुरिया
वय. ९/७/२०१८
विछड गये हो बीच राही में, दिल से नही जा पाओगे।
आँखो में आसुं है गम के, आप जीवनभर याद आओगे।
आपकी पावन स्मृती में भावपूर्ण श्रध्दांजली !
- शोकाकुल -
कथुरिया परिवार
भटियानी परिवार

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मोजे **मिंगार, ता. जि. अहमदनगर** येथील मिळकतीचे विद्यमान मालक **मोहतीम मालुदास मोरे**, रा. मिंगार, अहमदनगर यांचे मालकी हक्क मंडिळाचेही व प्रत्यक्ष कब्जे मंडिळाचेही असलेली अशी अनुक्त विद्यमान मालकांची सदर मिळकत आमचे अशिलास खरेदी देणेची बोलणी करून सौदा पक्का केलेला आहे व त्यापोटी साठेखताचा दस्त करून देवून रक्कमही स्विकारलेली आहे व लवकरच खरेखताचा व्यवहारही पूर्ण करणार आहेत.

वदर मिळकत विषेय, निजोजणी, विभक्तीजणी आहे असा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेले आहे. तरीही सदर मिळकतीबाबत कोणताही, कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध, गहाण, दान, खरेदी, साठेखत, बक्षीस, कर्ज, बोजा, लिज, लिन, वारसाहक्क, कोर्टमनाई हुकूम अथवा जप्ती, कोर्ट कार्यवाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाले पासून **१५ दिवसाचे** आत योग्य त्या कागदपत्री पुराव्या सह खालील पत्त्यावर समक्ष आणून द्यावी व पोहच घ्यावी मुदतीत कोणतीही काही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वाध व निर्जोखमी असे समजून आमचे अशिल खरेदीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील तद्नंतर कोणतीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.
परिशिष्ट - दि। अहमदनगर सर्व दि ।। व तालुका नगर येथे **मोजे मिंगार** येथील अहमदनगर जिल्हा परिषद इद्दीतील प्लॉट मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

गट नंबर	प्लॉट नंबर	क्षेत्रफळ	आकार
२२९/१	६ ५०	१२७.२६ चौ.मी.	रु. १२.७१ पै.

ही संपूर्ण मिळकत, मांसी चतु:सिमा सरकारी रेकॉर्डप्रमाणे.
वेगेघ्यमणी चतु: सपमुर्वक मिळकत वागणुकीच्या व महिवाणीच्या हक्कासहीत तदंगभुत वस्तुसहीत काहीही एक राखून न ठेविता.
दिनांक : ९/७/२०२४
ॲड. राचिन नोकुळ गिमते
मिर्लीद कॉलनी, आलमगीर, भिंगार, अहमदनगर. मो.नं. ९८८१४३९५४१

Career Ke Shurwat DISHA ke saath

2 लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी अनुभवलेला कोर्स
DCGA
Diploma Course in Graphics & Office Automation
JUST IN 8900/-
GET READY FOR YOUR JOB
JOIN TODAY
MS-OFFICE | TALLY PRIME | GST
CORELDRAW | ILLUSTRATOR | PHOTOSHOP
WEB PAGE DESIGNING | BASIC HARDWARE
Duration : 6 Months

Delhi Gate Branch	Old ST stand Branch	Pipeline Branch
1st Floor, Zink, Anand Kanjar Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001	1st Floor, Ambika Plaza, Near Lokmanthan Office, Near Malwada Stand, Station Road, A.nagar	Office No. 202, Second Floor Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003
9371051769	9371151769	7447761769

VAISHNAVI TILES & TRADING CO.

♦ सर्व प्रकारच्या टाइल्स ♦ ग्रॅनाइट ♦ सॅनिटरी वेअर
♦ पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग ♦ C.P. फिटिंग्ज
9590151515 I 9262515151
VARMORA TILES+BATHWARE | KERAKOLL The GreenBuilding Company | CARYSIL German Engineered | colortile | RAK CERAMICS | India's No. 1 NIRALI BG | TIMEX TOTO | ICON WORLD OF TILE
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांना कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेले सुर्ये प्लॉटचाचे विद्यमान मालक **श्रीमती. उषा विनोदकुमार अग्रवाल** रा. साईप्रसाद, सुरूरूजवार रोड, होटेल वैष्णव जवळ, अहमदनगर यांचे मालकी हक्काचे व महिवाटीचे अनुक्त यांनी सदर प्लॉटस् विक्री करण्याचा करार करून आमचे अशिलांकडेस वास्तवाहू खरेदी देण्याचे ठरविले आहे. तसेच व्यवहारपोटी विक्रेत्र मयुक्त आमचे अशिल अनुक्त रक्कम देखील घेतलेली आहे. तरीच सदर प्लॉटस् हे निर्वाध निर्जोखमी व बोजाहीन, अतिक्रमण विक्रय व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर प्लॉटस् बाबत कोणत्याही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, तक्रार, गणाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, गोरगी हक्क, वंशवाही गर्हाटन व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे. जर मुदतीत कोणत्याही कोणतेही हुरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉटसचे खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणत्याही कोणत्याही प्रकारे उगर हरकत चालणार नाही. अशाच्या त्यांनी जागीपुर्वक सोडून देणे आहे असे समजण्यात येईल.

परिशिष्ट
मिळकतीचे वर्णन : जिल्हा पुकर्ती अहमदनगर भो. तु. ता. नगर येथे अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मोजे सावेडी येथील मिन्सेली प्लॉटस् वर्णन खालील प्रमाणे. स.नं. ५०४/अ पथील प्लॉटस खालील प्रमाणे वर्णनचे.

प्लॉट नंबर	क्षेत्रफळ चौ.मी.	चांसी चतु:सिमा			
		पुर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
६९/७०/८०/८१/३	११८८.३८	६ मी. रस्ता	प्लॉट नं. ६९/७०/८०/८१/४	प्लॉट नं. ६९/७०/८०/८१/२	प्लॉट नं. ७५
६९/७०/८०/८१/४	११५८.००	६ मी. रस्ता	९ मी. रस्ता	प्लॉट नं. ६९/७०/८०/८१/१	प्लॉट नं. ६९/७०/८०/८१/३

वेगेघ्यमणी चतु:सिमापुर्वक प्लॉटस मिळकती काही एक राखून न ठेविता.
दि. ०९/०७/२०२४
अहमदनगर.
ॲड. संदीप नानवेद गोगडे
स्टेट बँक चौक, अहमदनगर-४१४००१.
मो. ९४२०३३५५३५, ८२८०३०७००

CONNPLEX

दि. : मुक्ती-शो च्या वेळा बदलू शकतात
दिनांक : 05 ते 12 जुलै 2024
कल्की (3D) 8.30 AM, 2.00 PM, 7.30 PM, 11.00 PM (2D) 7.30 AM, 11.00 AM, 5.45 PM, 9.15 PM
किल 9.00 AM, 11.15 AM, 3.45 PM 8.30 PM, 10.40 PM
डेस्पीकेबल (3D) Hindi 12.00 PM, 5.30 PM
मुंजा 6.00 PM
आम्ही जरांगे (मराठी) 2.30 PM
विषय हार्ड (मराठी) 1.30 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6333564618 / 7790094001

मा.दगडू मामा पवार

आज तुमच्या वाढदिवस लाख लाख शुभेच्छा
पवा ज्या अपेक्षिल्या
त्या साऱ्या पूर्ण होवोत इच्छा..
भावी आयुष्य आणि प्रगतीसाठी मनापासून शुभेच्छा
के.शंकरभाऊ वाणी
मा.नगरसेवक यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
संतोष वाणी ओम चैतन्य बिल्डर्स उद्योजक
गणेश (दादा) वाणी युवानेते अध्यक्ष : शंभूराजे प्रतिष्ठान
✻ गुरुपुष्प ✻
शंभूराजे प्रतिष्ठान, कै.शंकरभाऊ वाणी चौक
पाईपलाईन रोड, सावेडी उपनगर । समस्त मित्र परिवार, अ.नगर